दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२८८ | सोमवार, दि.१० फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये




## संपादकीय

### अर्थनितीचे प्रयत्न चांगले पण अनुभव वाईट

अर्थसंकल्पातून प्राप्तीकर स्लॅबमध्ये कपात केल्यानंतर एका आठवड्यानंतर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने रेपो दरात कपात करण्याची घोषणा केली. रेपो दर २५ बेसिस पॉइंट्सनी कमी करण्यात आला. याचा अर्थ असा की आरबीआय आता बँकांना स्वस्त दरात कर्ज देईल. त्यामुळे बँका पुढे ग्राहकांना कमी व्याजदरातील कर्जाचा लाभ देऊ शकतील. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर रेपो रेट म्हणजे रिझर्व्ह बँक इतर बँकांना ज्या दराने कर्ज देते तो दर. यंदा करण्यात आलेली कपात ही तब्बल पाच वर्षांनी करण्यात आली आहे, हे येथे विशेष व या विलंबामागची कारणे सगळ्यांना ज्ञात आहेत. २०२० नंतरची ही पहिलीच दर कपात आहे.

# अन्यथा कृषीमंत्र्यांच्या दारात सोयाबीन ओतणार!

पुणे । प्रतिनिधी

सरकारी सोयाबीन खरेदीची मुदत संपली आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. अद्याप अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी बाकी होती. मात्र, त्यापूर्वीच सरकारी खरेदी बंद केली आहे. याच मुद्यावरुन किसान सभा आक्रमक झली आहे. सरकारने खरेदी केंद्राची मुदत वाढवून पुन्हा सोयाबीन खरेदी सुरू करावी, अन्यथा किसान सभा राज्यभर आंदोलन छेडणार असल्याचा इशारा किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी दिला. तसेच मुदतवाढ न दिल्यास कृषी मंत्र्यांच्या दारात सोयाबीन ओतणार असल्याचेही नवले यांनी म्हटले आहे.



## सोयाबीन खरेदीच्या मुदतवाढीसाठी किसान सभेचा इशारा

सोयाबीन खरेदी बंद केल्याने अनेक शेतकरी वंचित आहेत. लाखो शेतकऱ्यांचे सोयाबीन पडून आहे. खरेदी केंद्राबाहेर अजूनही शेतकऱ्यांच्या रांगा असल्याचे अजित नवले म्हणाले. सोयाबीन खरेदी बंद झाल्याने अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यामुळे सरकारने खरेदी केंद्राची मुदत वाढवून पुन्हा सोयाबीन खरेदी सुरु करावी, अशी मागणी अजित नवलेंनी केली आहे. अन्यथा किसान सभा राज्यभर आंदोलन छेडणार असून, कृषीमंत्र्यांच्या घरावर सोयाबीन ओतणार असल्याचा इशारा डॉ. अजित नवले यांनी सरकारला दिला. सर्वच ठिकाणी नाफडेच्या सोयाबीन खरेदी केंद्राबाहेर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. अनेक सोयाबीन उत्पादक पान २ वर

# मनोज जरांगे यांचा मेहूणा तीन जिल्ह्यातून तडीपार

## जालना जिल्ह्यातील ९ जणांचा समावेश; आता यांचा आका कोण?

जालना । प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर राज्यात बीड जिल्ह्याचे नाव बदनाम करण्याचा प्रयत्न केला गेला. मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर सुध्दा आरोप करीत त्यांच्या राजीनाम्याची मागणी पुढे करण्यात आली. आता मनोज जरांगे यांच्या मेहूण्यासह ९ जणांवर तडीपारची कारवाई करण्यात आली असून जालना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या या सर्वांचा आका कोण? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. यात मनोज जरांगे यांचे मेहूणे विलास



### या तिघांचा आका कोण?

मनोज जरांगे यांचा मेहुणा विलास हरिभाऊ खेडकर व सुयोग सोळुंके, गजानन सोळुंके या तिघांचाही या यादीत समावेश असून, हे मनोज जरांगे यांच्यासोबत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे या तीन आरोपींचा आका कोण ? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### जरांगेंच्या मेहूण्यावर नेमके कोणते गुन्हे?

१)२०२१ मध्ये ट्रॅक्टरद्वारे अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. २)२०२३ मध्ये गोदावरी नदीतून ४ लाख ८१ हजार रुपयांची १०० ब्रास वाळू चोरी प्रकरणी गुन्हा. ३)२०२३ साली जालन्यातील शहागड इथे बस जाळल्याप्रकरणी ३०७, ३५३ आणि ४३५ या कलमान्वये गुन्हा दाखल. ४)२०२३ रोजी पाथरवाला बुद्रुक येथे गोदावरी मधून केणी च्या साह्याने ५०० ब्रास वाळू चोरी केल्याप्रकरणी गोंदी पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल. यामुळे विलास खेडकर याला जालना, छत्रपती संभाजीनगर आणि परभणी या तीन जिल्ह्यातून उपविभागीय न्यायदंडाधिकारी यांच्या आदेशाने तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे.

**खेडकर यास तीन जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.**

जालन्यात कायदा व सुव्यस्था कायम राहावी या हेतून आता बीडमध्ये वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये पान २ वर

# खा.सोनवणेंच्या कारखान्यात ऊसतोड मुकादमांना डांबले

## बीड ग्रामीण पोलिसात तक्रार अपहरणकर्त्याच्या मुलीची आक्रमक भुमिका

बीड । प्रतिनिधी

खा. बजरंग सोनवणे यांच्या मालकीच्या असलेल्या येडेश्वरी साखर कारकान्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी रात्री दोन ऊसतोड मुकादमांचे बीड शहरापासून जवळ असलेल्या एका चौकातून अपहरण केले. त्यांना येडेश्वरी कारखान्यावर डांबून ठेवल्यानंतर अपहरणकर्त्याच्या मुलीने याबाबत आक्रमक भुमिका घेत पोलिस ठाणे गाठले. त्यामुळे या प्रकरणाची वाच्यता झाली. यात ऊसतोड मुकादमांचे अपहरण करून त्यांना डांबून ठेवल्याने खा. बजरंग सोनवणे यांच्याविषयी नाराजीचा सुर निघत असून या प्रकरणाची त्यांनी जबाबदारी घ्यावी, अशी मागणी होऊ लागली आहे.



खा. बजरंग सोनवणे यांच्या मालकीच्या येडेश्वरी साखर कारखान्याची उचल ऊसतोड मुकादम सदाशिव सातेराम चव्हाण, किसन भानदास सुर्वे (सुर्याचीवाडी) यांच्याकडे होती. येडेश्वरी कारखान्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पाळत ठेवत चव्हाण व सुर्वे यांचे बीड शहराजवळील महालक्ष्मी चौकातून शनिवारी रात्री अपहरण केले. अपहरण केल्यावर त्यांना येडेश्वरी कारखान्यावर डांबून ठेवण्यात आले. तसेच मुकादमांच्या कुटुंबियांकडे पैसे द्या, पान २ वर

# शिवजन्मोत्सव सोहळ्यात यावर्षी शिवशाही महानाट्याचे आयोजन-आ. विजयसिंह पंडित





गेवराई । प्रतिनिधी

आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सालाबादाप्रमाणे यावर्षी "राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ चे थाटात आयोजन करण्यात येत असून यावर्षी शिवजन्मोत्सव सोहळ्यात सुप्रसिद्ध ऐतिहासिक महानाट्याचे लेखक महेंद्र महाडिक दिग्दर्शित " शिवशाही " या ऐतिहासिक महानाट्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी पत्रकार परिषदेत दिली.

शिवजन्म शिवजन्मोत्सव सोहळ्याची माहिती देताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की २०१४ पासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन केले जाते. वर्गणी आणि डीजे मुक्त वातावरणात हा शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला जातो. यापूर्वी शिवगर्जना, शिवपुत्र संभाजी, राजा शिवछत्रपती या महानाट्याचे आयोजन करण्यात आले व त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित ऐतिहासिक महानाट्य शिवशाही चे आयोजन करण्यात आलेले आहे. पान २ वर

# पंकजाताई मुंडेंच्या आदेशानंतर अधिकाऱ्यांनी केली परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेची पाहणी

## परळीच्या मेरूगिरी डोंगरासह, लोणी, लोणारवाडी येथील जागांना दिल्या भेटी

परळी वै. । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या आदेशानंतर पशुवैद्यकीय विज्ञान विद्यापीठाच्या तसेच महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आज परळीत होत असलेल्या प्रस्तावित पशुवैद्यकीय महाविद्यालयांसाठी विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेटून जागेची पाहणी केली.



पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळीत पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याकरिता विभागाला नुकतेच आदेशित केले होते. महाविद्यालय स्थापन करण्याकरिता मुलभूत सोयीसुविधांचे निरीक्षण व भारतीय पशू चिकित्सा परिषद नवी दिल्ली यांचे मानकानुसार आवश्यक असलेल्या बाबींच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरिय निरीक्षण समिती गठीत करण्यात आली असून या समितीचे अध्यक्ष तथा पशू विज्ञान विद्यापीठाचे डीन डॉ. एस व्ही. उपाध्ये, डॉ. जी. एस. खांडेकर, कनिष्ठ अभियंता डॉ. पी.व्ही. तायडे, पान २ वर

## 'आयएसआय' साठी हेरगिरी करणाऱ्या जवानाला अटक

नाशिक : नाशिक येथील आर्मी कॅन्टोन्मेंटमध्ये तैनात असलेले नाईक संदीप सिंह यांना पाकिस्तानची गुप्तचर संस्था 'आयएसआय'साठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. आरोपीकडून तीन मोबाईल फोन जप्त करण्यात आले पान २ वर

# तपासणी यंत्रणांकडून माहिती लपविली जातेय?

## देशमुख कुटुंबियांना न्याय मिळणार की नाही ; अंजली दमानिया यांचा सवाल

मुंबई । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेला रविवारी ९ फेब्रुवारी रोजी दोन महिने झाले. या दोन महिन्यांनंतर देशमुख कुटुंबियांना न्याय मिळणार आहे की नाही असा संशय निर्माण होत आहे. जे दोन मोबाईल मिळाले, त्या मोबाईलमधून डेटा रिट्राईव्ह करण्यात आला की नाही. त्यात मोठ्या नेत्याचा आवाज असल्याने त्या मोबाईलबाबतची माहिती लपविली जातेय अशी शंका सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी रविवारी एक्सवर एक व्हिडिओ अपलोड करत त्या माध्यमातून व्यक्त केली.



अंजली दमानिया पुढे बोलताना म्हणाल्या की, संतोष देशमुख यांची हत्या ज्या निर्घृणपणे झाली पान २ वर



## छत्तीसगडच्या विजापूरमध्ये ३१ नक्षलवादी ठार; दोन जवान शहिद

विजापूर । वृत्तसंस्था

छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यातील इंद्रावती राष्ट्रीय उद्यानात झालेल्या चकमकीत सुरक्षा दलाचे दोन जवान शहिद तर ३१ माओवादी ठार झाले असल्याची माहिती पोलिसांनी रविवारी सकाळी दिली. उद्यानाच्या एका विशिष्ट भागात माओवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलाच्या संयुक्त पथकाने त्या ठिकाणाकडे कूच केल्यानंतर ही चकमक झाली. पान २ वर

# महिला व बालविकास विभागाच्या परिक्षा १०,१३ अन् १७ फेब्रुवारीला

## २६ जिल्ह्यात ऑनलाईन पद्धतीने केली परिक्षांची व्यवस्था

मुंबई । प्रतिनिधी

महिला व बालविकास विभागाअंतर्गत विविध रिक्त पदे सरळसेवा पद्धतीने भरण्यात येत आहेत. १०,१३ व १७ फेब्रुवारी रोजी २६ जिल्ह्यात ४५ केंद्रांवर ऑनलाईन पद्धतीने परीक्षा आयोजित करण्यात आली असून, https://www. wcdcompune.com या संकेतस्थळावर वेळापत्रक उपलब्ध आहे. या परीक्षा पारदर्शक आणि सुरळीत होण्यासाठी कार्यवाही करण्यात आली असल्याची माहिती सह आयुक्त राहुल मोरे यांनी दिली.

संरक्षण अधिकारी गट-ब (अराजपत्रित) दोन पदे, परिविक्षा अधिकारी




गट-क ७२ पदे, लघुलेखक (उच्चश्रेणी) गट -क एक पद, लघुलेखक (निम्नश्रेणी) गट -क दोन पदे, वरिष्ठ लिपीक/ सांख्यिकी सहाय्यक गट-क ५६ पदे, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ)गट- क ५७ पदे, वरिष्ठ काळजी वाहक गट -ड चार पदे, कनिष्ठ काळजी वाहक पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०८ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८.०० क्विंटल | ३,२९० | ३,२९० | ३,२९० |
| ज्वारी/हायब्रिड : २१.०० क्विंटल | २,१०० | २,४०० | २,२३६ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : १७५.०० क्विंटल | ६,५९० | ७,१८६ | ७,०१३ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ५,००० | ६,३०० | ५,६५० |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,९८० | २,९८० | २,९८० |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| सोयाबीन: २४३.५० क्विंटल | ३,८०१ | ४,०६० | ४,००८ |
| हरभरा: १०.०० क्विंटल | ५,४७० | ५,५०० | ५,४८५ |

**• सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला आ.संदीप क्षीरसागर आले धावून!**

# हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढ द्यावी

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ऐनवेळी आ.संदीप क्षीरसागर धावून आले आहेत. मतदारसंघासह जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या खरेदीसाठी नाफेडकडे नावनोंदणी केली, मात्र मुदत संपल्यानंतर आता ही खरेदी कधी होणार? असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असून शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढी द्यावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पणण मंत्री जयकुमार रावल व राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे केली आहे. याबाबत लेखी पत्रही आ.क्षीरसागर यांनी दिले आहे.

## मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्र्यांसह पणन मंत्र्यांशी आ.संदीप क्षीरसागरांचा पत्रव्यवहार

## नाफेडकडे नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांचा विचार करण्याची मागणी



सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर अन्? त्यांच्या संवादातून लक्षात आलेल्या समस्या लक्षात घेवून आ.संदीप क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांच्या भावना पत्र लिहून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यापर्यंत पोहचवल्या आहेत. हंगाम २०२४-२५ मधील हमीभावाने सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिल्यास सर्व शेतकऱ्यांकडील सोयाबीन खरेदी होवू शकते याकडे लक्ष वेधत आ.संदीप क्षीरसागर यांनी याबाबतच्या पत्रात नमूद केले आहे की, केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या संदर्भीय धोरणानुसार सुरूवातीला दि.३१ जानेवारी २०२५ पर्यंत त्यानंतर दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सोयाबीन खरेदीच्या बाबतीत मुदतवाढ देण्यात आली होती; परंतु बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील नोंदणीधारक शेतकरी ४४ हजार ७०० च्या वर आहेत. त्यापैकी दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत किमान २१ हजार शेतकरी बांधवांककडून सोयाबीन पान २ वर

## अग्रलेख

# अर्थनितीचे प्रयत्न चांगले पण अनुभव वाईट

अर्थसंकल्पातून प्राप्तीकर स्लॅबमध्ये कपात केल्यानंतर एका आठवड्यानंतर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने रेपो दरात कपात करण्याची घोषणा केली. रेपो दर २५ बेसिस पॉइंट्सनी कमी करण्यात आला. याचा अर्थ असा की आरबीआय आता बँकांना स्वस्त दरात कर्ज देईल. त्यामुळे बँका पुढे ग्राहकांना कमी व्याजदरातील कर्जाचा लाभ देऊ शकतील. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर रेपो रेट म्हणजे रिझर्व्ह बँक इतर बँकांना ज्या दराने कर्ज देते तो दर. यंदा करण्यात आलेली कपात ही तब्बल पाच वर्षांनी करण्यात आली आहे, हे येथे विशेष व या विलंबामागची कारणे सगळ्यांना ज्ञात आहेत. २०20 नंतरची ही पहिलीच दर कपात आहे. बाजारात सूस्ती आली असल्याच्या बातम्या गेल्या काही काळात सातत्याने प्रसृत होत आहेत. विभागवार जे आढावे घेतले गेले आणि अहवाल जाहीर करण्यात आले आहेत त्यातही यावर शिक्कामोर्तब झाले आहे. विकासदराच्या संदर्भात जी अपेक्षा केली होती अथवा लक्ष्य निर्धारित केले होते तेथपर्यंत पोहोचू शकत नसल्याचेही आता म्हटले जाते आहे. या पार्श्वभूमीवर रेपो दर कमी करण्याचे मुख्य कारण म्हणजे अर्थव्यवस्थेला चालना देणे हेच आहे.

कोविड-१९ साथीच्या आजारामुळे आणि जागतिक आर्थिक मंदीमुळे भारतीय अर्थव्यवस्था कठीण काळातून गेली आहे. कोविडचा जगालाच मोठा फटका बसला आहे. विकसनशील देशांना त्याची धग जास्त जाणवली. अनेक व्यवहार मंदावले आणि सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले. त्यातून त्यांना सावरायला अजून जमलेले नाही. विकास दर अजूनही अपेक्षेपेक्षा कमी आहे. रेपो दर कमी करून, आरबीआयने अर्थव्यवस्थेतील रोख प्रवाह वाढवण्याचा आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थसंकल्पातही मध्यम वर्गाला हलवणे हाच हेतू होतो. आताचाही घेण्यात आलेला हा निर्णय या वर्गालाच सक्रिय करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. जेव्हा आरबीआय रेपो दर कमी करते तेव्हा व्यावसायिक बँका स्वस्त दराने कर्जे उभारतात. याद्वारे या बँकांच्या ग्राहकांनाही कमी दराने कर्ज मिळण्याचा मार्ग खुला होतो. यामुळे व्यवसाय आणि उद्योगांना गुंतवणुकीसाठी अधिक भांडवल मिळते, ज्यामुळे आर्थिक व्यवहारांना चालना मिळते. पैसा खेळता राहतो किंवा खर्च करण्याची हिंमत प्राप्त होते. एका अर्थाने या निर्णयामुळे ग्राहकांच्या खर्चात वाढ होऊ शकते. लोकांना कमी व्याजदराने कर्ज मिळत असल्यामुळे किंवा मिळणार असल्यामुळे त्यांची क्रयशक्ती वाढते. ग्राहक वस्तू इत्यादी खरेदी करण्यासाठी पैसे खर्च करू लागतात. सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा असतो तो महागाईचा. कारण सगळ्या वर्गांचे जे महिन्याचे बजेट असते त्यावर महागाईचेच मोठे सावट असते. त्याच्या दैनंदिन जीवनावर जो सगळ्यात जास्त प्रभाव पडतो तो महागाईचाच. रेपो दराचा महागाईवरही परिणाम होतो. तथापि, सध्या महागाई नियंत्रणात असल्याचा आरबीआयचा दावा आहे व त्यामुळे म्हणा किंवा ठरवून काही निर्णायक पावले उचलली जात आहेत याचे स्वागत आहे. अर्थात भविष्यात जर महागाई वाढण्याची चिन्हे दिसली तर आरबीआय व्याजदर वाढवू शकते. रेपो दर कमी केल्यामुळे गृहकर्ज, वाहन कर्ज, वैयक्तिक कर्ज आणि इतर प्रकारच्या कर्जांवरील व्याजदर कमी होऊ शकतात. त्या दृष्टीने बँका आता काय घोषणा करतात हे पाहावे लागेल. त्यांनी तसे केले तर त्याचा या क्षेत्रांशी संबंधित उद्योगांना चांगलाच फायदा होतो. मात्र प्रश्न असा आहे की बँकांना जो लाभ मिळणार आहे त्याचे फायदे ते ग्राहकांपर्यंत पोहोचू देणार आहेत का? इंधन दराच्या बाबतीत असे अनेकदा अनुभवास आले आहे की कच्च्या तेलाचे दर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक असले तर ग्राहकाला त्या प्रमाणात पैसे मोजावे लागतात. मात्र हेच दर जेव्हा कमी होतात तेव्हा त्या प्रमाणात ग्राहकाला त्याचा लाभ दिला जात नाही.

गेल्या आठ-दहा वर्षांत यासंदर्भात अनेकदा ओरड झाली आहे. त्यामुळेच आताही बँका त्यांना जो लाभ होणार आहे त्याचा फायदा पुढे पोहोचवत नाहीत तोपर्यंत त्याच्याशी जोडलेल्या संपूर्ण साखळीला फायदा होणार नाही. या साखळीत उत्पादन कारखाने, दुकानदार, सेवा देणाऱ्या कंपन्या आणि ग्राहकांचा समावेश आहे. किरकोळ बाजारात उपलब्ध असलेल्या वस्तूंच्या किमतींवरूनच ग्राहक महागाई समजते. म्हणजेच, जर ग्राहकांना स्वस्त किमतीत उत्पादन मिळाले तरच ते फायदेशीर मानले जाईल. तरच त्याच्या दृष्टीने या निर्णयाला काही अर्थ असेल किंवा त्याला त्याबाबत स्वारस्य असेल. महागाईची कारणमीमांसा करताना जे दाखले किंवा डोस पाजले जातात ते महागाई कमी करताना किंवा तशी संधी उपलब्ध झाल्यावर सोईस्करपणे दुर्लक्षित केले जातात. बाजार अनेक गोष्टींवर नियंत्रण ठेवतो, मात्र ग्राहकांना त्याचा फायदा मिळत नसेल, तर सर्व प्रयत्न वाया जातात. रेपो दरात कपात करूनही ग्राहकोपयोगी वस्तू स्वस्त होत नाहीत, असे अनेक वेळा घडले आहे.

## ...तर आपला एक वेगळा पक्षच उभा राहील-पंकजा मुंडे



नाशिक । प्रतिनिधी

**गोपीनाथ मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या लोकांचा जर आपण एक साठा केला तर एक वेगळा पक्षच उभा राहील इतकी मोठी ताकद मुंडे साहेबांच्या प्रेम करणाऱ्या लोकांमध्ये आहे, असे विधान भाजप नेत्या, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.**

श्री स्वामी समर्थ कृषी विकास आणि संशोधन चॅरिटेबल ट्रस्ट, दिंडोरी आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक कृषी महोत्सवाचे उद्घाटन पंकजा मुंडे यांच्या हस्ते नाशिकमध्ये झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात पंकजा मुंडे यांनी शेतकरी बांधवांना संबोधित केले. या कार्यक्रमाला धुळ्याच्या खासदार शोभाताई बच्छाव, भाजप आमदार सीमा महेश हिरे, आण्णासाहेब मोरे, लक्ष्मण सावजी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पर्यावरण, नद्या पुनर्जीविताचा विषय ते महाराष्ट्रात भाजप रुजण्यात गोपीनाथ मुंडे यांचे योगदान अशा विषयांवर पंकजा मुंडे यांनी भाष्य केले. गोपीनाथ मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या खूप मोठी आहे. त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांचा जर आपण एक साठा केला तर एक वेगळा पक्षच उभा राहील. पर्यायाने माझ्याबरोबर जोडले गेलेले केवळ मुंडे साहेबांची मुलगी म्हणून मला जोडले जाऊ शकले नसते, लोक गुणांचा स्वीकार करतात, लोक मुंडे साहेबांच्या गुणांवर प्रेम करतात, त्यामुळे गुणांचा वारसा स्वीकारून ते माझ्याशी जोडले गेले, असे पंकजा मंडे म्हणाल्या. तसेच मुंडे साहेबांनी भारतीय जनता पार्टी पक्षाच्या जन्मापासून काम केले आणि तो पक्ष खऱ्या अर्थाने त्यांनीच उभा केला, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. महाराष्ट्रात भाजप रुजविण्याचे काम गोपीनाथ मुंडे यांनीच केले, असेच त्यांनी थेटपणे सांगण्याचा प्रयत्न केला.

# पंढरीनाथ सावंत साहेब, आम्हाला माफ करा, पत्रकार म्हणून आम्ही पेन्शन मिळवून देऊ शकलो नाही!


## पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांची खंत

ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ सावंत यांचं निधन त्यांच्या सर्व चाहत्यांसाठी नक्कीच वेदनादायी आहे.. पंढरीनाथ सावंत हे आमचे मार्गदर्शक आणि चांगले ज्येष्ठ स्नेही होते.. अलिबागला असताना अनेकदा त्यांना आम्ही विविध कार्यक्रमांना निमंत्रित करत असू.. दोन तीन वर्षांपुर्वी मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले होते.. एका गोष्टीचं मात्र नक्कीच दु:ख वाटतंय.. पत्रकार म्हणून आम्ही त्यांना पेन्शन मिळवून देऊ शकलो नाही.. आयुष्यभर निष्ठेनं पत्रकारिता केल्यानंतरही माहिती आणि जनसंपर्क विभागाच्या निष्ठूर अधिकाऱ्यांनी त्यांचा पेन्शनचा अर्ज निर्दयपणे फेटाळून लावला होता.. अधिकाऱ्यांचं म्हणणं होतं, त्यांची ३० वर्षे पत्रकारिता झालेली नाही..गंमत अशी की,पंढरीनाथ सावंत यांचं पत्रकारितेतील योगदान आणि दीर्घकाळ केलेली निष्कलंक पत्रकारिता पाहून महाराष्ट्र शासनाने त्यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले होते.. म्हणजे बघा, एकीकडं म्हणायचं त्यांनी ३० वर्षे पत्रकारिता केलेली नाही आणि दुसरीकडे त्यांना जीवन गौरव पुरस्कार द्यायचा हा सारा भंपकपणा नाही का? जीवनगौरव देता, मग पेन्शन का दिली नाही? पंढरीनाथ सावंत यांचा मुद्दा घेऊन आम्ही तेव्हाच्या माहिती आणि जनसंपर्क राज्यमंत्री अदिती तटकरे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही भेटलो होतो.. उपयोग झाला नाही.. हे सर्व पंढरीनाथ सावंत यांना माहिती होते.. एक दिवस त्यांचा मला फोन आला.. हताशपणे म्हणाले, ''देशमुख, तुम्ही माझ्यासाठी प्रयत्न करता आहात ते मी बघतोय, पण सरकारलाच मला पत्रकार पेन्शन द्यायची नसेल तर तुम्ही तरी काय करणार? द्या सोडून विषय.. मी ही आता पेन्शन हा विषय सोडून दिला आहे'' .. नंतरही आम्ही पाठपुरावा करीत राहिलो पण आम्हाला यश



आले नाही.. सावंतसाहेब आम्हाला माफ करा.. आज ज्या पत्रकारांना पेन्शन मिळते त्यातील काही जण पेन्शन योजनेच्या निकषात बसत नाहीत.. म्हणजे पेन्शनसाठी पात्र नाहीत.. तरीही ते लाभार्थी आहेत.. त्यांचे अर्ज कसे मंजूर होतात हे मला माहिती आहे..मात्र आयुष्यभर निष्ठेनं पत्रकारिता करणारे पंढरीनाथ सावंत सरकारच्या कोणत्याच योजनेचे लाभार्थी नसतात.. अशा पत्रकारांची मोठी यादी मी देऊ शकेल.. पंढरीनाथ सावंत यांना आम्ही जीवनगौरव दिला होता, तो कार्यक्रम उलहासनगरला झाला होता.. या कार्यक्रमात बोलताना ''मी ज्या पध्दतीचा पत्रकारिता केली त्या मार्गानं गेलात तर हाती कटोरे घ्यावे लागतील'' असे वक्तव्य त्यांनी केले होते.. त्यांच्या या विधानातील अगतिकता आणि हाताशा उपस्थितांचे काळीज चिरत गेली .. ते शेवटपर्यंत चाळीतील एका खोलीत राहात.. आम्ही एकदा त्यांच्या घरी गेलो होतो..दाटीवाटीत पुस्तकाचं भांडार ठेऊन हा वृध्द, तपस्वी पत्रकार पत्रकारिता करीत होता.. त्यांना कोटयातलं घर द्यावं असं कोणत्याच सरकारला वाटलं नाही..हे अनाकलनीय आहे.. समाज पत्रकारांकडून चांगुलपणाची अपेक्षा करतो.. पंढरीनाथ सावंत यांच्या अंगी हा चांगुलपणा ठासून भरलेला होता.. समाजानं या चांगूलपणाचं कोणतं बक्षीस पंढरीनाथ सावंत यांना दिलं? सरकार सारखाच समाजही ढोंगी आहे.. पत्रकारांकडून लाख अपेक्षा करणारा समाज गरज असते तेव्हा पत्रकारांसाठी पुढं येताना दिसत नाही.. तरीही पंढरीनाथ सावंत यांच्यासारखे काही वेडे, ध्येयवादी समाजासाठी आपण काही केले पाहिजे असं शेवटपर्यंत सांगत राहतात आणि कामही करीत राहतात.. मार्मिकचे माजी संपादक म्हणून लौकीक मिळविलेल्या पंढरीनाथ सावंत यांनी पुढारी, लोकमत, सिने ब्लिटझ आणि प्रभंजनमध्येही त्यांनी काम केलं. अखेरच्या काळात उपेक्षेचे धनी ठरलेले सावंत साहेब काल ९१ व्या वर्षी आपल्याला सोडून गेले.. सावंत साहेब तुमची आदर्श आणि ध्येयवादी पत्रकारिता नक्कीच तरूण पत्रकारांना मार्ग दाखवत राहील.. विनम्र अभिवादन.

# बिरेन सिंह यांनी दिला मणिपूरच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह यांनी रविवारी (दि.९) मुख्यमंत्रीपदाचा पदाचा राजीनामा दिला. त्यांनी राजभवनात राज्यपाल अजय कुमार भल्ला यांच्याकडे राजीनामा सादर केला. डिसेंबर २०२४ मध्ये त्यांनी मणिपूरमधील जातीय हिंसाचाराबद्दल जनतेची माफी मागितली होती. ते म्हणाले होते की, हे संपूर्ण वर्ष खूप वाईट गेले. ३ मे २०२३ पासून आजपर्यंत जे काही घडले त्याबद्दल मी राज्यातील जनतेची माफी मागतो. अनेकांनी त्यांचे प्रियजन गमावले. अनेक लोक आपली घरे सोडून गेले. मला याबद्दल वाईट वाटते. गेल्या तीन-चार महिन्यांतील शांततापूर्ण परिस्थिती पाहून, मला आशा आहे की २०२५ मध्ये राज्यात सामान्य स्थिती पूर्ववत होईल.

## पान १वरून...

### अन्यथा कृषीमंत्र्यांच्या

शेतकरी सोयाबीन विक्रीसाठी दिवस-रात्र सोयाबीन केंद्राबाहेर ठाण मांडून आहेत. मात्र, अद्याप या सोयाबीनची विक्री झालेली नाही. ६ फेब्रुवारीपर्यंत सोयाबीन खरेदीची मुदत होती. मात्र, ती संपल्याने पुन्हा मुदतवाढ द्यावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत. खरेतर नाफेडच्या खरेदी केंद्राच्या माध्यमातून अर्ध्या शेतकऱ्यांचे देखील सोयाबीनची खरेदी झालेली नाही. तर शेतकऱ्यांनी नाफेडकडे नोंदणी केलेली संख्या अधिक आहे. झालेल्या खरेदीतही बारदाना, कडता, हमालीच्या नावावर शेतकऱ्यांची लुट केली जात आहे. त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे संपुर्ण सोयाबीन हमीभावाने खरेदी करावे, अशी मागणी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांकडून केली जाते आहे. दरम्यान, राज्यातील बहुतेक जिल्ह्यात सोयाबीन खरेदीला मुदत वाढ मिळण्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सोयाबीन खरेदीला मुदतवाढ मिळावी यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे.

----------

### खा.सोनवणेंच्या कारखान्यात

तुमचे माणसं घेऊन जा, असा निरोप देण्यात आला. त्यानंतर ऊसतोड मुकादम सदाशिव चव्हाण यांची मुलगी शितल चव्हाण हिने थेट बीड ग्रामीण पोलिस ठाणे गाठत आक्रमक भुमिका घेतली. माझ्या वडिलांना येडेश्वरी कारखान्याचे महेंद्र पाटील व इतर कर्मचाऱ्यांनी उचलून नेले असून त्यांच्या जिविताला धोका असल्याची तक्रार दिली. त्यामुळे हे प्रकरण प्रसार माध्यमात आल्याने पोलिस व येडेश्वरी कारखाना प्रशासन यांच्यावर दबाव वाढला. खा. बजरंग सोनवणे यांच्या पीएचा डांबून ठेवलेल्या ऊसतोड मुकादमाच्या नातेवाईकांना फोन आल्याचे म्हटले जात असून प्रकरण बाहेरच्या बाहेर मिटवू, तुमचा माणूस आणून देतो, असे सांगण्यात आल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान मुलीच्या धाडसानेच येडेश्वर कारखाना प्रशासनाला झुकते घ्यावे लागले. शिवाय खा. बजरंग सोनवणे यांचा येडेश्वरी कारखाना असल्याने त्यांनी या प्रकरणाची जबाबदारी घ्यावी, अशी मागणी होऊ लागली आहे.

--------------

### मनोज जरांगे यांचा मेहूणा

आरोपी असलेल्यांना तडीपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये मनोज जरांगे यांचे काही नीकटवर्तीय आणि नातेवाईकही असल्याचे समोर आले आहे. अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या एकूण ९ जणांना जालना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. यात वामन मसुरराव तौर, रामदास मसुरराव तौर (दोन्ही रा. शिवनगाव ता. घनसावंगी), संदीप सुखदेव लोहकरे (रा. अंबड), गोरख बबनराव कुरणकर (रा. कुरण), अमोल केशव पंडित (रा. अंकुशनगर), गजानन गणपत सोळुंके, संयोग मधुकर सोळुंके (रा. गोंदी), विलास हरिभाऊ खेडकर (रा. गंधारी) आणि केशव माधव वायभट (रा. अंकुशनगर, ता. अंबड) अशी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या ९ आरोपींची नावे आहेत. मनोज जरांगे यांचे मेहूणे विलास खेडकर यास तीन जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. या आरोपींवर अवैध वाळू उत्खनन, जाळपोळ, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, धमकावणे असे अनेक गुन्हे दाखल आहेत.

--------------

### पंकजाताई मुंडेंच्या आदेशानंतर

आरिफ शेख, तांत्रिक अधिकारी डॉ पी. इ. ताकसांडे यांच्यासह परळीचे उप जिल्हाधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. विजय कराड, उपायुक्त डॉ. आर डी कदम आदींनी आज तालुक्यातील लोणी, लोणारवाडी या गावांसह परळी शहरातील वैद्यनाथ मंदिराच्या परिसरात असलेल्या मेरूगिरी डोंगरावरील जागेची पाहणी केली. महाविद्यालयांसाठी लागणारी जमीन लोणी येथे १२ हेक्टर, लोणारवाडी येथे १८ हेक्टर आणि परळी शहराच्या मेरूगिरी डोंगरावर सुमारे २० हेक्टर जमीन उपलब्ध आहे, या सर्व ठिकाणी मुलभूत सोयी सुविधा देखील सहज उपलब्ध होऊ शकतील का? याचा देखील आढावा अधिकाऱ्यांनी घेतला. जागेच्या पाहणीचा अहवाल ना. पंकजाताई मुंडे यांना सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

--------------

### शिवजन्मोत्सव सोहळ्यात यावर्षी शिवशाही

या नाटकांमध्ये राजमाता जिजाऊ म्हणून सिनेतारका अलका कुबल, छत्रपती शिवाजी महाराज सिने कलावंत शंतनू मोघे, हंबीरराव मोहिते नाट्य अभिनेते प्रकाश धोत्रे, कागा भट्ट महेश कोकाटे, संत तुकाराम महाराज रमेश रोकडे, बाजीप्रभू देशपांडे राजेश आहेर, हे भूमिका सादर करणार असून यात २५० सहभागी कलाकार सहभागी होणार आहेत. सुप्रसिद्ध लेखक तथा नाट्यनिर्माते महेंद्र महाडिक दिग्दर्शित शिवशाही या महानट्याचे ५५ फुटाचा हायड्रोलिक सेट हे वैशिष्ट्य आहे. शिवजयंतीच्या दिनी शुभारंभाचा मुख्य शो १९ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थित होणार असून हा शो सर्वांसाठी विनामूल्य आणि खुला आहे. २० फेब्रुवारी रोजी फक्त महिलांसाठी तर २१ फेब्रुवारी रोजी फक्त विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला आहे. प्रेक्षकांसाठी खुर्च्यांची बैठक व्यवस्था करण्यात येणार असून शिवशाही महानाट्य व शिवजन्मोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत असलेल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**नाट्यमंच आणि मंडप उभारणी कामांचा भव्य शुभारंभ**

राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित ऐतिहासिक महानाट्य शिवशाही साठी नाट्यमंच आणि मंडप उभारणी कामांचा भव्य शुभारंभ आज शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजक आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे , आप्पासाहेब गव्हाणे, सुभाषराव मस्के, जालिंदर पिसाळ, नगरसेवक शाम येवले, शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, सरपंच शितल साखरे, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, सहकार्याध्यक्ष संदिप मडके, सहकार्याध्यक्ष संतोष सुतार, उपाध्यक्ष ॲड मनोज हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल, सचिव राहुल मस्के, सहसचिव शहादेव निकम, कोषाध्यक्ष पप्पू पठाण, सह कोषाध्य रणजित घुंबार्डे, कार्यकारणी सदस्य प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------

### महिला व बालविकास विभागाच्या

गट -ड ३६ पदे, स्वयंपाकी गट -ड सहा पदे या संवर्गातील सरळसेवा कोट्यातील २३६ रिक्त पदे भरण्याकरीता कॉम्पुटरबेस्ट वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची ऑनलाईन परिक्षा टीसीएस मार्फत घेण्यात येणार आहे. परिक्षार्थी यांचे स्थानिक जिल्ह्यात व लगतच्या ठिकाणी परीक्षा केंद्र ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावर टीसीएस कंपनीमार्फत केंद्र समवेक्षक व पर्यवेक्षक, तर आयुक्तालयामार्फत निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. सर्व केंद्रांवर सिग्नल जॅमर बसविण्यात येणार असून, यामुळे गैरप्रकाराला आळा बसणार आहे. तसेच, केंद्रांवर बायोमेट्रीक व आय स्कॅनिंग व फेस रिडींग केले जाणार आहे. तसेच प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. परीक्षा केंद्रावरील सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक यांना पुरेसा बंदोबस्त व वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्याकरिता सूचना देण्यात आल्या आहेत. उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला अथवा अफवांना बळी पडू नये, कुणीही गैरमार्गाने नोकरी देण्याचे अथवा परीक्षा पास करून देण्याचे आमिष दाखवित असल्यास नजीकच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधण्याचे आवाहन सह आयुक्त मोरे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी पुणे येथील महिला व बालविकास आयुक्तालय कार्यालय अथवा ०२०-२६३३३८१२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

--------------

### छत्तीसगडच्या विजापूरमध्ये ३१

गट -ड ३६ पदे, स्वयंपाकी गट -ड सहा पदे या संवर्गातील सरळसेवा कोट्यातील २३६ रिक्त पदे भरण्याकरीता कॉम्पुटरबेस्ट वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची ऑनलाईन परिक्षा टीसीएस मार्फत घेण्यात येणार आहे. परिक्षार्थी यांचे स्थानिक जिल्ह्यात व लगतच्या ठिकाणी परीक्षा केंद्र ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावर टीसीएस कंपनीमार्फत केंद्र समवेक्षक व पर्यवेक्षक, तर आयुक्तालयामार्फत निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. सर्व केंद्रांवर सिग्नल जॅमर बसविण्यात येणार असून, यामुळे गैरप्रकाराला आळा बसणार आहे. तसेच, केंद्रांवर बायोमेट्रीक व आय स्कॅनिंग व फेस रिडींग केले जाणार आहे. तसेच प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. परीक्षा केंद्रावरील सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक यांना पुरेसा बंदोबस्त व वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्याकरिता सूचना देण्यात आल्या आहेत. उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला अथवा अफवांना बळी पडू नये, कुणीही गैरमार्गाने नोकरी देण्याचे अथवा परीक्षा पास करून देण्याचे आमिष दाखवित असल्यास नजीकच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधण्याचे आवाहन सह आयुक्त मोरे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी पुणे येथील महिला व बालविकास आयुक्तालय कार्यालय अथवा ०२०-२६३३३८१२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. बस्तर रेंजचे पोलिस महानिरीक्षक, सुंदरराज पी. यांनी पुष्टी केली की, चकमकीत शहिद झालेले जवान हे जिल्हा राखीव रक्षक आणि स्पेशल टास्क फोर्स माओवादी विरोधी ऑपरेशन्समध्ये तज्ञ असलेल्या राज्यस्तरीय दलांचे सदस्य होते. माओवाद्यांच्या तळाजवळ पोलिस पोहोचल्यानंतर गोळीबार झाला आणि या गोळीबारात काही नक्षलवाद्यांचा मृत्यू झाला. इंद्रावती नॅशनल पार्कमध्ये या वर्षातील ही दुसरी चकमक आहे, जिथे १२ जानेवारी रोजी तीन माओवाद्यांना ठार करण्यात आले होते. अबुझमदला लागून असलेला राष्ट्रीय उद्यान परिसर माओवाद्यांसाठी सुरक्षित आश्रयस्थान असल्याचे मानले जाते. २,७९९.०८ चौरस किलोमीटरमध्ये पसरलेल्या या उद्यानाची सीमा महाराष्ट्राला लागून आहे आणि १९८३ मध्ये व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आले आहे. या वर्षी आतापर्यंतच्या चकमकीत ६२ माओवादी मारले गेले आहेत आणि छत्तीसगडमध्ये माओवाद्यांशी लढताना ११ जवानांनाही प्राण गमवावे लागले आहेत. या वर्षी माओवाद्यांच्या हल्ल्यात विजापूरमधील पाच नागरिकांसह किमान नऊ नागरिकांचा मृत्यू झाला.

**३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद नष्ट करू - अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री शहा यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''नक्षलमुक्त भारत बनवण्याच्या दिशेने, सुरक्षा दलांना छत्तीसगडमधील बिजापूरमध्ये मोठे यश मिळाले आहे. या कारवाईत ३१ नक्षलवाद्यांना ठार मारण्यासोबतच मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि स्फोटकेही जप्त करण्यात आली. आज आपण मानवताविरोधी नक्षलवादाचा अंत करताना आपले दोन शूर सैनिक गमावले आहेत. हा देश या वीरांचा नेहमीच ऋणी राहील. शहीद जवानांच्या कुटुंबियांबद्दल मी मनापासून संवेदना व्यक्त करतो. मी माझा संकल्प पुन्हा व्यक्त करतो की, ३१ मार्च २०२६ पूर्वी आपण देशातून नक्षलवाद पूर्णपणे नष्ट करू. जेणेकरून देशातील कोणत्याही नागरिकाला त्यामुळे आपला जीव गमवावा लागू नये, असे अमित शहा यांनी स्पष्ट केले आहे.

--------

### तपासणी यंत्रणांकडून माहिती

तसे कृत्य पुन्हा होऊ नये यासाठीच बीडमध्ये वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे यांच्या संगमताने झालेले जमिनीचे, राखेच्या विक्रीचे गैरव्यवहार आदी गोष्टी बाहेर काढल्या. मात्र माहितीनुसार धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्यावर कारवाई होण्याऐवजी या प्रकरणी काही लपवले जात आहे. कोणी तरी कोणाला वाचविण्यात असल्याचेही त्या म्हणाल्या. अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत बोलताना अंजली दमानिया म्हणाल्या की, सगळीकडून धनंजय मुंडे यांना अजित पवार आणि मुख्यमंत्री फडणवीस हे वाचविण्याचा प्रयत्न करत असल्याचे बोलले जात आहे. ते निर्णय घेण्यात एकमेकांवर टोलवाटोलवी करताना दिसून येत आहेत असेही त्या म्हणाल्या. पुढे बोलताना अंजली दमानिया म्हणाल्या की, जी काळी स्कॉर्पिओ गाडी मिळाली, त्या गाडीत दोन मोबाईल मिळाले. त्यावेळी अनेक माध्यमांनी अशी बातमी दाखविली की त्या मोबाईलमधील डेटा पुन्हा मिळविण्यात येणार आहे. मात्र दोन महिने झाले तो डेटा अद्याप परत मिळविला की नाही याबाबत अद्याप कोणतीच माहिती पुढे आली नाही. त्याचबरोबर त्यामधील एका फोनवर एका मोठ्या नेत्याशी फोनवरून संभाषण केल्याची बातमीही अनेक माध्यमांवर दाखविण्यात आली. मात्र तो नेता कोण, त्या बड्या नेत्याला वाचविण्यासाठीच यासंदर्भातील सगळी माहिती लपविली जात आहे का? असा संशय निर्माण होत आहे. त्याचबरोबर ज्या अवादा कंपनीकडून खंडणीचा जो व्यवहार झाला तो व्यवहार शासकिय बंगल्यात झाला, तो म्हणजे सातपुडा बंगला. त्याची माहिती भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी जाहिरसभांमध्ये दिली. मग त्या व्यवहारात धनंजय मुंडे हेही सहभागी असल्याचे दिसतेय. मग धनंजय मुंडे यांचा राजीनामा का घेतला जात नाही असा सवालही यावेळी त्यांनी केला. अंजली दमानिया पुढे बोलताना म्हणाल्या की, धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्या आर्थिक हितसंबधाचे सर्व पुरावे पुढे आणूनही धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला जात नाही. जो पर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला जात नाही तोपर्यंत तपास यंत्रणांवर दबाव हा राहणार आहे. सर्व पुरावे पुढे आणूनही धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागितला जात नाही. की केवळ ते धनंजय मुंडे यांचे मित्र असल्याने ते त्याला वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत असा सवाल उपस्थित करत या निमित्ताने आता देशमुख कुटुंबियांना न्याय मिळणार आहे की असाच प्रश्न निर्माण होत असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. शेवटी बोलताना अंजली दमानिया म्हणाल्या की, संतोष देशमुख यांच्यासारखे दुसरे प्रकरण पुन्हा राज्यात घडू नये यासाठी हा लढा मी आणि आपण लढत आहोत. मात्र या संदर्भात राज्य सरकारच निर्णय घेण्याऐवजी टोलवाटोलवी करत असल्याचे दिसून येत आहे. या संपूर्ण प्रकरणात कोणी काही तरी लपवत आहे. असा आरोपही यावेळी त्यांनी केला.

------------

### सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या

खरेदी झालेली आहे. बीड मतदार संघासह जिल्ह्यातील किमान ४० टक्क्याच्यावर शेतकरी बांधवांची खरेदी अजूनही शिल्लक आहे. त्यामुळेच या सर्व शेतकरी बांधवांच्या सोयाबीनची खरेदी करण्यासाठी मुदतवाढ द्यावी व त्यातून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी महत्वाची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. निवेदनातच्या प्रती राज्याचे मुख्य सचिव व अवर सचिवांनाही पाठवण्यात आल्या आहेत. आ.संदीप क्षीरसागर यांनी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न राज्य शासनापर्यंत पोहचवले आहेत. आता शासनाकडून मुदतवाढीचा निर्णय कधी होतो याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे.

--------------

### 'आयएसआय' साठी हेरगिरी करणाऱ्या

आहेत. याद्वारे त्याने 'आयएसआय'ला गुप्तचर माहिती आणि लष्कराची गुपिते पुरवली आहेत. या कामासाठी आरोपीने वेगवेगळ्या ठिकाणांहून एकूण १५ लाख रुपये घेतल्याचे उघड झाले आहे. एसएसपी चरणजित सिंह सोहल आणि एसपी हरिंदर सिंह यांनी सांगितले की, आरोपी संदीप सिंहने सैन्याशी संबंधित अनेक महत्त्वाची माहिती विकली आहे. आरोपी संदीप सिंह २०१५ मध्ये सैन्यात भरती झाला होता. पटियालामधील सरदुलगड येथील रहिवासी संदीप सिंह त्याच्या साथीदारांसह देशातील अनेक लष्करी छावण्यांबद्दल माहिती गोळा करत आहे आणि ती व्हॉट्सॲपद्वारे पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेला पाठवत होता.

------------

cmyk

## शिक्षणतीर्थ संस्कृती विद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले अवकाशाचे निरीक्षण

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षणतीर्थ संस्कृती विद्यालयामध्ये खगोल अभ्यासक विकास मिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी अवकाशातील ग्रहांचा अभ्यास केला. अवकाशातील ग्रहताऱ्यांबद्दल सर्वांनाच कुतूहल असते परंतु आपल्याकडे ते बघण्याची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे ते बघता येत नाहीत.आज गुरुकुलमध्ये श्री . मिटकर यांच्या टेलिस्कोपद्वारे विद्यार्थ्यांनी पहिल्यांदा ग्रह व त्यांचे उपग्रह बघितले. मुले हरखून गेली होती. यावेळी संस्थाचालक डॉ. दत्ता नलावडे यांनीपण अवकाश निरीक्षणाचा आनंद घेतला.अशा उपक्रमामुळे मुलांमध्ये संशोधन वृती वाढते. ग्रहाबद्दल असलेले समज गैरसमज याबद्दल विकास मिटकर यांनी मुलांना मार्गदर्शन केले. मुलांनीही त्यांना पडणारे प्रश्न विचारले त्याची शास्त्रीय उत्तरे यांनी मुलांना दिली.




# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार, दि. १० फेब्रुवारी २०२५




# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत तायक्कांदोमध्ये बीडच्या नयन बारगजे हिला रौप्यपदक

बीड । प्रतिनिधी

भारत सरकार कडून आयोजीत ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने तायक्कांदो खेळात क्योरोगी प्रकारात गौरव भटला सुवर्ण, नयन बारगजे, सिद्धी बेंडाळे, शिवानी भिलारेला रौप्यपदके तर पुमसे प्रकारात एक सुवर्ण पदकासह दोन रौप्य आणि चार ब्राँझपदकांची कमाई केली आहे . महाराष्ट्राने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत एकूण १५ पदकांची कमाई केली असून प्रत्येक खेळाडूला महाराष्ट्र शासनाकडून अनुक्रमे ७ लक्ष , ५ लक्ष व ३ लक्ष रुपये पारितोषिक मिळणार आहे.

भारत सरकारच्या इंडियन ऑलम्पिक असोसिएशन कडून आयोजित हल्दवानी येथे आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलात सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ८७ किलो वरील वजन गटात गौरव भट याने सुवर्णपदक जिंकले. ४९ वजन गटात नयन बारगजे हिने अंतिम फेरीत धडक मारली. नयन बारगजे , शिवानी भिलारे, सिद्धी बेंडाळे यांनी ३ रौप्यपदके, तर साक्षी पाटील, अभिजित खोपडे, वसुंधरा छेडे, भारती मोरे ,मनीषा गुत्तेदार , आयुष ओहोळ , श्रेया जाधव यांनीही ब्राँझपदकांची लयलूट केली. पुमसे दुहेरीमध्ये वसुंधरा छेडे आणि शिवम भिसले ब्राँझपदक, मिश्र पूमसे प्रकारात वंश ठाकूर व मृणाली हर्नेकर यांनी अरुणाचल प्रदेशच्या जोडीवर



### शासनाकडून मिळणार ५ लक्ष रूपये पारितोषिक

रोमहर्षक मात करून सुवर्णपदक पटकावले. वैयक्तिक पूमसे प्रकारात मृणाली हर्नेकरने यश संपादन केले.५७ किलो वजन गटात शिवानी भिलारे हिला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. साक्षी पाटील (४८ किलो) व अभिजित खोपडे (५४ किलो) यांनी कांस्यपदके जिंकली तर वैयक्तिक पूमसे प्रकारात वंश ठाकूर व वसुंधरा छेडे यांना ब्राँझपदक बहाल करण्यात आले. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रशिक्षक प्रविण बोरसे , प्रविण सोनकुल, अमोल तोडनकर, रॉबीन सर, छत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते लाला भिल्लारे , प्रमोद कदम यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले.

तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र , मुंबई संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, महासचिव तथा छत्रपती पुरस्कार विजेते मिलींद पठारे, कोषाध्यक्ष व्यंकटेश्वर राव करग, डॉ. योगेश क्षीरसागर , डॉ. सारिकाताई क्षीरसागर, नितीनचंद्र कोटेचा, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, दिनकर चौरे , जया बारगजे, भारत पांचाळ , बन्सी राऊत, मनेश बनकर यांनी पदक विजेत्या खेळाडूचे अभिनंदन केले आहे.

पदक विजेत्या खेळाडूंचा सत्कार !!

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदक विजेत्या सर्व खेळाडूचा व प्रशिक्षकांचा सत्कार सोहळा राज्य संघटनेच्या वतीने बालवाडी क्रीडा संकुलात १४ ते १६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान आयोजित राज्यस्तरीय ओपन स्पर्धा च्या निमित्ताने शनिवारी आयोजित करण्यात येणार आहे. याच वेळी सर्वोत्कृष्ट खेळाडू, सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक पुरस्कार २०२५ चे वितरण करण्यात येणार आहे.

## राष्ट्र प्रथमच्या प्रेरणेसह ‘युथ फॉर माय भारत’ शिबिराचा समारोप

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे ब्रह्मगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे आयोजित ‘युथ फॉर माय भारत’ विशेष हिवाळी शिबिराचा समारोप राष्ट्र प्रथमच्या प्रेरणादायी विचारांनी आणि सामाजिक बांधिलकीच्या संकल्पासह संपन्न झाला.

समारोप समारंभाचे अध्यक्ष ग्रामपंचायत सरपंच रोहिदास पवार होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निबोरे यांनी ‘‘उद्याच्या भारतासाठी तुम्ही तरुण आहात‘‘ या संकल्पनेवर विचार मांडले. ‘‘या शिबिरातून तुम्हाला समाजसेवेचे, श्रमदानाचे आणि नेतृत्वाचे धडे मिळाले आहेत. समाजात वावरताना राष्ट्र प्रथम या तत्वाचे पालन करा आणि



जबाबदारीने कार्य करा,‘‘ असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजना ध्वजाला मानवंदना देऊन करण्यात आली. यानंतर एन. एस. एस. गित झाले आणि ध्वज विधीपूर्वक उतरवण्यात आला.

शिबिरातील सात दिवसांचा आढावा गट समन्वयक डॉ. रवी सातभाई यांनी सविस्तर अहवाल वाचनाद्वारे मांडला. स्वयंसेवक कु. साक्षी सानप आणि सोपान वांढरे यांनी आपले अनुभव कथन करत, ‘‘या शिबिरातून आम्हाला समाज आणि ग्रामविकास यासाठी योगदान देण्याची संधी मिळाली,‘‘ असे सांगितले.

यानंतर प्राचार्य डॉ. सोपानराव निबोरे यांनी स्वयंसेवकांना समाजातील जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करण्याचा सल्ला दिला. त्यांनी ‘‘या शिबिरातून घेतलेले अनुभव आणि शिकवण तुमच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात परिवर्तन घडवतील,‘‘ असे सांगत युवकांनी राष्ट्र प्रथम या विचाराने प्रेरित राहावे, असे आवाहन केले. ग्रामपंचायत सरपंच रोहिदास पवार यांनी अध्यक्षीय समारोप करताना ‘‘या शिबिरामुळे गावात सकारात्मक चैतन्य निर्माण झाले. स्वच्छता, समाजसेवा आणि एकजुटीच्या मूल्यांची जाणीव झाली. भविष्यातही अशा उपक्रमांना ग्रामस्थांचा पूर्ण पाठिंबा असेल,‘‘ असे सांगितले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गट समन्वयक डॉ. रवी सातभाई, कार्यक्रम अधिकारी डॉ. सुहास गोपणे, डॉ. महेंद्र वैरागे, प्रा. शुभांगी खुडे यांनी विशेष मेहनत घेतली.संपूर्ण सात दिवस स्वयंसेवकांनी श्रमदान, पर्यावरण संवर्धन, व्यक्तिमत्त्व विकास आणि ग्रामविकास उपक्रमांमध्ये योगदान दिले. शिबिरातून मिळालेली शिकवण आणि राष्ट्र प्रथमचा विचार जीवनभर सोबत ठेवण्याचा संकल्प करीत स्वयंसेवकांनी गावाला निरोप दिला.

## वैद्यराज शाळेत स्नेहसंमेलन



अंबड । प्रतिनिधी

अंबड येथे वैद्यराज सितारामजी घुले ग्रामीण विकास व शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचालित वैद्यराज प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, अंबड वार्षिक स्नेहसंमेलनाचे कार्यक्रमाचे उदघाटन बदनापूर अंबड मतदारसंघाचे आमदार श्री. नारायण कुचे यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी उपस्थित अंबड नगरपरिषदेचे मा. नगराध्यक्ष देविदास कुचे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. मनोज उकिर्डे, संस्थेचे सचिव गंगाधर घुले , मुख्याध्यापिका सौ. घुगे मॅडम, रामकीसन घुगे , श्री. श्रीकांत जायभाये ,श्रीराम नागरे, नगरसेवक श्री. गंगाधर भैय्या वराडे, श्री. सौरभ कुलकर्णी, श्री. धर्मराज बाबर, बाळासाहेब तायडे, बाळू शहाणे, सुनील बिडे, युसूफ मणियार, रमेश बुंदेलखंडे, प्रकाश शेळके, विष्णू पुंड, लक्ष्मण राक्षे, सतीश कुलकर्णी, सर्व नगरसेवक, पदाधिकारी व विद्यार्थी, पालक व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ सावंत यांचे निधन

मुंबई । प्रतिनिधी

ज्येष्ठ पत्रकार आणि मार्मिक साप्ताहिकाचे माजी कार्यकारी संपादक पंढरीनाथ सावंत यांचे आज पहाटे राहत्या घरी झोपेतच निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने मराठी पत्रकारितेतील एक ध्येयवेडे आणि परखड व्यक्तिमत्त्व हरपले आहे.

सावंत यांनी आपल्या पत्रकारितेच्या प्रवासात बेस्ट कंडक्टर ते मार्मिकचे कार्यकारी संपादक असा उल्लेखनीय प्रवास केला. त्यांच्या कार्याची दखल घेत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार, तसेच मराठी पत्रकार परिषद, मुंबई आणि मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांचे जीवनगौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आले होते.



त्यांना प्रबोधनकार ठाकरे आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विशेष स्नेह लाभला होता. बाळासाहेब ठाकरे यांचे ते विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जात. सावंत यांच्या निधनाने पत्रकारितेतील एक धाडसी आणि अभ्यासू व्यक्ती गमावल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. मुंबई मराठी पत्रकार परिषद मुंबई यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत कुटुंबीयांच्या दुःखात सहभाग दर्शवला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, अशी श्रद्धांजली सर्व स्तरांतून वाहिली जात आहे.

## एकलव्य माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाला जनसागर लोटला

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील डोंगर पट्ट्यात चिखलबीड याठिकाणी शिक्षणाचा वटवृक्ष म्हणुन उभा असलेली एकलव्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ही शाळा गेल्या पंचवीस वर्षापासुन विद्यार्थी घडवण्याचे काम मोठ्या जोमाने करत आहे. याच शाळेने ग्रामीन भागात कुठेच होत नसलेला स्नेह संमेलनाचा कार्यक्रम पहिल्यांदा घेतला,अन आश्चर्य म्हणजे या कार्यक्रमाला चिखलबीड हे अख्खं गाव व पंचक्रोशीतील जनसागराने तोबा गर्दि केली.या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी विविध हिंदी मराठी गाण्यावर अप्रतीम असे डान्स करत धम्मालच उडवून दिली व उपस्थीत प्रेक्षकांची मने जिंकली.

सविस्तर वृत्त असे की वडवणी तालुक्यातील डोंगरपट्टयासारख्या दुर्गम भागात गेल्या पंचवीस वर्षापुर्वी एकलव्य माध्यमिक विद्यालय नावाचं शिक्षणाचे रोपटे लावले अन्? पहाता पहाता हे रोपट्याचा वटवृक्ष झाला,खेड्यापाड्यात राहाणारे हजारो विध्यार्थी या शाळेमुळे शिक्षक, डॉक्टर,इंजिनिअर,वकिल, पोलिस झाले आहेत. चिखलबीड याठिकाणी शिक्षणाचा वटवृक्ष म्हणुन उभा असलेली एकलव्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ही शाळा गेल्या पंचवीस वर्षापासुन विध्यार्थी घडवण्याचे काम मोठ्या जोमाने करत आहे



या शाळेच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर विद्याथ्यार्थ्यांच्या कला गुणांन वाव मिळावा म्हणुन स्नेहसंमेलनाचा सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यात आला दि. ०७ फेब्रुवारी शुक्रवारी रोजी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते,यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध वेष भुषा परीधान करत हिंदी मराठी गाण्यावर चिमुकल्या विद्यार्थांनी धम्माल उडवून दिली. कार्यक्रमाची सुरुवात ! गणेश वंदनेने केली.

पुष्पा, लुंगी डान्स,वारी चुकायची नाही,शिवाजी महाराजांचा कीर्ति पोवाड़ा, तेरी मिठी में मरजावा, यासह शेकडो गाण्यवर अप्रतीम डान्स केला. प्रेक्षक पालकांनीही युवाकलाकारांच्या कलेला टाळ्यांच्या कडकडाटासह दाद दिली. या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेच्या संस्थापिका मा. सुशिलाताई मोराळे मॅडम यांनी केले,तर प्रमुख उपस्थिती म्हणुन चिंचवनचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे, मुख्याध्यापक घुले सर, सरपंच सौ. सागर विलास वडणे, जेष्ठ नेते कानिकराव मुंडे, मा.सरपंच विकास मुंडे, लोकमानसचे संपादक सतिशजी वाघमारे, पोलिस पाटील गुलाब वाघमारे, चेअरमन आश्रुबा वडणे, श्रीमंत(आप्पा) नेहरकर, बाबासाहेब होंडे, युवा नेते रंजित वडणे, मुस्तफा (भैया) पठाण, महादेव फरांडे, यांची

कार्यक्रमासाठी उपस्थिती होती. तर कार्यक्रमासाठी परीश्रम घेणारे शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याद्यापक श्री.कानाडेसर,

आघाव सर, बोदर सर, चव्हाण एस बी, सानप सर, साखरे सर, आंधळे सर, चंदनशिव सर ,नेकनुरकर सर, लव्हाळे सर, ठोंबरे सर, यादव सर, गवारे सर, राऊत सर, तोगेमॅडम, देशमुख, चोलेसर ,नेहरकर, सह सर्व शिक्षक यांनी मेहनत घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चव्हाण डीटी, यांनी केले,तर ऊपस्थीतांचे अभार बोंद्रे सर यांनी मानले.

### बक्षिसांचा वर्षाव

या शाळेच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर विद्याथ्यार्थ्यांच्या कला गुणांन वाव मिळावा म्हणुन स्नेहसंमेलनाचा सांस्कृतीक कार्यक्रम दि. ०७ फेब्रुवारी शुक्रवारी रोजी घेण्यात आला. यामध्ये विद्यार्यांच्या विविध वेष भुषा परीधान करत हिंदी मराठी गाण्यावर चिमुकल्या विद्यार्थांनी धम्माल उडवून दिली. हा कार्यक्रम पहाण्यासाठी चिखलबीड हे अख्खं गाव शाळेच्या मैदानात उपस्थित झाले होते तर विद्यार्थांच्या प्रत्येक गाण्यावर हाजारो रुपयांचे बक्षिस येत होते,संपुर्ण कार्यक्रमात एकूण पंचवीस हजार रुपये जमा झाले आहेत.

पान ६ वरून...

### अभिषेक नाईक व गणेश

अथक परिश्रम करून हे यश मिळवले आहे. त्याच्या या निवडीमुळे सामाजिक कार्यकर्ते सावळेराम बळे आबा यांनी त्यांचा सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच त्यांच्यावर मित्र परिवारातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अभिषेक नाईक आणि गणेश देवगुणे हे सर्वसामान्य कुटुंबातील असून आई-वडिलांच्या कष्टाकडे बघून त्यांनी अभ्यास केलेला आहे त्यांच्या या परिश्रमाचे चीज झाले असून ग्रामपंचायतीने भागातील विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा असे हे उदाहरण आहे अभिषेक नाईक आणि गणेश देवगुणे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून सामाजिक कार्यकर्ते सावळेराम बळे आणि निळकंठ खेडकर यांनी त्यांचा सत्कार केला.

### श्री विश्वकर्मा जयंती मिरवणूक

श्री क्षेत्र भेंड टाकळी ह.भ.प.गणेश महाराज लोंढे यांचे दुपारी १२:०० ते २-०० यावेळेत काल्याचे किर्तन होईल,किर्तनानंतर दु.२:०० ते ५:०० यावेळेत महाप्रसाद होईल.या वेळी प्रमुख उपस्थिती आ.प्रकाश सोळंके,माजी आ. राधाकृष्ण होके, आ.विजयराजे पंडित,मोहन जगताप, जयसिंह सोळंके,माघव निर्मळ,बाबरी मुंडे, कल्याण आबुज, गिताराम अनभुले, कृष्णाकांत कुटे, सरपंच किशोर फुलसरे यांची उपस्थिती राहणार आहे.

तरी या भव्यदिव्य धार्मिक कार्यक्रमाचा समाज बांधवांनी लाभ घेऊन मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान संघटनेचे तालुकाध्यक्ष परमेश्वर पांचाळ, उपध्यक्ष राजेभाऊ पांचाळ,अशोक दिगंबरे यांनी केले आहे.

### पाचरट कादंबरीचे आमदार

ही कादंबरी वाचावी व वाचन संस्कृती टिकवावी असे आपल्या मनोगत भाषणात आवाहन केले कामगार महामंडळात इतर नागरिकांनी अतिक्रमण केल्याने खर्या लाभार्थ्यांना लाभ मिळत नाही म्हणून कामगार महामंडळात कामगार नोंदणी झाली त्यांची फेरतपासणी करण्यासाठी येणाऱ्या अधिवेशनात आवाज उठवू तसेच ज्या ग्रामसेवकांनी, व कॉन्ट्रॅक्टदारनी सह्या दिल्या आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आशे मत देखील आमदार सुरेश धस यांनी वेक्त केले यावेळी विजय जावळे (साहित्यिक),विठ्ठल जाधव (साहित्यिक), अंमळनेर जिल्हा परिषद गटाचेनेते भाऊसाहेब भवर,पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव,अँड महेश भोसले,पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, युवानेते संदीप जाधव यांच्यासह अनेक मान्यवारांच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा पार पडला.

### आई-वडिलांच्या

पोलीस दलामध्ये जनतेच्या सेवेमध्ये दाखल झाले आहेत.आई-वडील सतत शेतामध्ये काबाडकष्ट करत असून. त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवत त्यांच्या मुलांनी मोठ्या यशाला गवसणी घातली असून.आई-वडिलांच्या कष्टाच,परिश्रमाचे खऱ्या अर्थाने सोनाली आणि शरद या बहिण-भावाने कष्टाचे चीज करून.खऱ्या अर्थाने आई-वडिलांच्या काबाडकष्टाला खाकी वर्दीची सलामी देत.आई-वडिलांचा आपल्या मुलं शासकीय नोकरी लागून चार घास सुखाचे खायला मिळतील .हे स्वप्न सत्यात उतरवले असून ते पूर्ण केले आहे.या अलौकिक अशा बहिण-भावाच्या यशाचं वडगाव गुंदा परिसरामध्ये कौतुक होत असून. त्यांच्यावर शुभेच्छा रुपी वर्षाव केला जात असून,सध्या या बहिण-भावाच्या यशाची चर्चा परिसरामध्ये जोरदार रंगत आहे

डोंगरे बहिण-भावाच यश गावातील मुलांना दीपस्तंभासारखे भारत बडे

आपल्या आई वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत डोंगरे रावसाहेब डोंगरे कुटुंबातील शरद डोंगरे व सोनाली डोंगरे या बहिण भावाच्या जोडीने महाराष्ट्र पोलीस दलामध्ये सह्याद्री सारखं यश मिळवला असून या दोघांची झालेली महाराष्ट्र पोलीस दलामध्ये झालेली निवड हे आमच्या गावातील आणि परिसरातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ सारखे यश असून या यशाची प्रेरणा घेऊन अनेक विद्यार्थ्यांचा यशाचा मार्ग सापडण्यासाठी नक्कीच या बहिण भावाची पोलीस दलामध्ये झालेली निवड इतर विद्यार्थ्यांना दीपस्तंभा सारखी प्रेरणा देत राहील.या बहिण भावाला महाराष्ट्रातील जनतेची सुरक्षा सेवा करण्यासाठी खूप-खूप शुभेच्छा...!


जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक १०/०२/२०२५

**जाहीरनामा**

ख.खत,७/१२

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता २) अजित मच्छिंद्र चक्रे २) भागवत साधु वीर राहणार बीड

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र.१/१/६७१५ सव्हे नं.- १५८ तरफ पिंगळे क्षेत्र-१५३.३४ चौ.मी. वर श्री/सौ. विश्वास बसीधर नाटकर व इतर बीड चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
पूर्व- १५ फुटाचा रस्ता
पश्चिम सरकारी कंपाऊंड
दक्षिण - वीर व कोरडे यांचा प्लॉट
उत्तर - कोरडे यांचे घर

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**



जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक १०/०२/२०२५

**जाहीरनामा**

७/१२ आधारे

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता १) नंदा अशोक शिंदे २) तारामती मधुकर तावरे राहणार बीड

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र. सव्हे नं.- १८३ आ २ तरफ पिंगळे पैकी क्षेत्र-८.९८ आर वर श्री/सौ. मुळ मालक स्वत: चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
पूर्व-७/१२ आधारे
पश्चिम- ७/१२ आधारे
दक्षिण- ७/१२ आधारे
उत्तर- ७/१२ आधारे

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**



जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक १०/०२/२०२५

**जाहीरनामा**

ख.खत

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता १) भाग्यश्री तुकाराम सावंत २) प्रिती श्रीराम सावंत राहणार बीड

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र. सव्हे नं.- १०२ पैकी तरफ पिंगळे क्षेत्र-१२१.९० चौ.मी. प्लॉट नं. वर श्री/सौ. साईनाथ बळीराम चव्हाण व इतर बीड चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
पूर्व-मोराळे, इतरांची जमीन
पश्चिम ९ मी.रुंदीचा रस्ता
दक्षिण - ९ मी.रुंदीचा रस्ता
उत्तर - प्लॉट क्र.७७

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**



जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक १०/०२/२०२५

**जाहीरनामा**

ख.खत-७/१२, गॅझेट आधारे

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता सचिन धोंडीराम पाटील राहणार बीड

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र.१/४/६२१४ सव्हे नं.- ३०/अ पैकी तरफ देशमुख क्षेत्र-८५.०३ चौ.मी. प्लॉट नं. वर श्री/सौ. स्वत: बीड चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
पूर्व-गिराम यांनी विक्री केलेले प्लॉट
पश्चिम २० फुटाचा रस्ता
दक्षिण - भुसारी यांनी विक्री केलेला प्लॉट
उत्तर - काशिनाथ गिराम यांचा प्लॉट

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**



जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक १०/०२/२०२५

**जाहीरनामा**

ख.खत

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता मुनीरखान हबीबखान राहणार बीड

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र. सव्हे नं.- १५३ तरफ देशमुख क्षेत्र-३९०.३३ चौ.मी. प्लॉट नं. ९७/९८/७१/७२ वर श्री/सौ. प्रशांत शांतीनाथ नेवडे व इतर बीड चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
पूर्व- २० फुटाचा रस्ता
पश्चिम २० फुटाचा रस्ता
दक्षिण - प्लॉट क्र.७३ व ९९
उत्तर - प्लॉट क्र.७० व ९६

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**


cmyk

# एफआरपी थकबाकीप्रकरणी १३ साखर कारखान्यांना नोटिसा

## आयुक्तालयात येत्या गुरूवारी होणार सुनावणी

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील गाळप हंगाम आता अंतिम टप्प्यात आला आहे, तरी १३ साखर कारखान्यांनी एफआरपीप्रमाणे ऊसबिले दिली नाहीत. त्यामुळे प्रादेशिक साखर सहसंचाललक प्रकाश आष्टेकर यांनी या कारखान्यांना नोटिसा बजावल्या आहेत. तसेच येत्या गुरुवारी (दि.१३) साखर आयुक्तालयात त्यावर सुनावणी ठेवली आहे.

रयतक्रांती शेतकरी संघटनेचे नेते, ऊसदर नियंत्रण मंडळाचे सदस्य प्रा. सुहास पाटील यांनी यासंबंधी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे तक्रार केली होती. त्यांच्या तक्रारीची दखल घेत साखर सहसंचालकांनी या कारखान्यांना नोटिसा काढल्या आहेत.

त्याच्यावरील पहिली सुनावणी आता १३ फेब्रुवारीला होणार आहे. या कारखान्याच्या अध्यक्ष आणि व्यवस्थापक यांना या नोटिसा देण्यात आल्या आहेत. या आधीही संघटनेने या मागणीसाठी सतत पाठपुरावा करत आंदोलन केले.



पण कार्यवाही झाली नव्हती, पण आता साखर सहसंचालक कार्यालयाने याबाबत भूमिका घेतल्याचे दिसते.

...या कारखान्यांचा समावेश

नोटीस बजावलेल्या साखर कारखान्यांमध्ये वेणूनगर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना, आलेगाव बु (ता. माढा) येथील भैरवनाथ शुगर वर्क्स, तुर्कपिंपरी (ता. बार्शी) येथील बबनरावजी शिंदे शुगर अ‍ॅण्ड अलाईड इंडस्ट्रिज, अनगर (ता. मोहोळ) येथील लोकनेते बाबूराव पाटील अ‍ॅग्रो इंडस्ट्रिज, नांदूर (ता.मंगळवेढा) येथील आवताडे शुगर, वाकीशिवणे (ता.सांगोला) येथील धाराशिव शुगर, उपळाई (ता.बार्शी) येथील इंद्रेश्वर शुगरमिल्स, वटवटे (ता. मोहोळ) येथील जकराया शुगर, लवंगी (ता. मंगळवेढा) येथील भैरवनाथ शुगर वर्क्स, कचरेवाडी (ता. मंगळवेढा) येथील युटोपियन शुगर्स, बीबीदारफळ (ता. उत्तर सोलापूर) येथील लोकमंगल शुगर इथेनॉल अ‍ॅण्ड कोजनरेशन इंडस्ट्रिज, भंडारकवठे (ता. दक्षिण सोलापूर) येथील लोकमंगल अ‍ॅग्रो इंडस्ट्रिज, तिऱ्हे (ता. उत्तर सोलापूर) येथील सिद्धनाथ शुगर या कारखान्यांचा समावेश आहे.

## दिन विशेष

### जागतिक दिवस

वन अग्नि सुरक्षा साप्ताहाच चौथा दिवस.
व्हॅलेंटाईन आठवड्याचा चौथा दिवस
(टेडी दिवस)

### महत्वाच्या घटना

१९२१ : ड्यूक ऑफ़ कनॉट ने भारतातील इंडिया गेट चा पाया आजच्या दिवशी रचला.
१९२१ : महात्मा गांधी यांनी काशी विद्यापीठाची स्थापना केली.
१९२३ : टेक्सास टेकनॉलोजिकल कॉलेज सध्याचे टेक्सास टेक विद्यापीठाची स्थापना केली.
१९२९ : जे. आर. डी टाटा हे पहिले अधिकृत भारतीय वैमानिक बनले.
१९३१ : भारताची राजधानी कोलकात्याहुन नवी दिल्ली येथे हलवली.
१९३३ : न्यूयॉर्कमध्ये झालेल्या एका मुष्टियुद्ध लढतीत प्रिमो कार्नेरा याने अर्नी शाफ याचा १३ व्या फेरीत पराभव केला. या लढतीत अर्नी शाफचा मृत्यू झाला.
१९४८ : पुणे विद्यापीठाची स्थापना
१९४९ : गांधी-वध अभियोगातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची निष्कलंक सुटका झाली.
१९७९ : इटानगर हे शहर अरुणाचल प्रदेश ची राजधानी बनले.
१९९६ : आय. बी. एम. कंपनीने बनवलेल्या ''डीप ब्लू'' या महासंगणकाने बुद्धीबळात गॅरी कास्पारॉव्हचा पराभव केला.
२००५ : उत्तर कोरियाने आपण अण्वस्त्रसज्ज असल्याचे जाहीर केले.
२००९ : आजच्या दिवशी पंडित भीमसेन जोशी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४७ : प्रसिद्ध लेखक नवीनचंद्र सेन यांचा जन्म.
१८०३ : जगन्नाथ ऊर्फ 'नाना' शंकरशेठ दानशूर व शिक्षणतज्ज्ञ (मृत्यू: ३१ जुलै १८६५)
१८९४ : हॅरॉल्ड मॅकमिलन इंग्लंडचे पंतप्रधान (मृत्यू: २९ डिसेंबर १९८६)
१९१० : दुर्गा भागवत साहित्यिका व मानववंशशास्त्रज्ञ (मृत्यू: ७ मे २००२)
१९४२ : भारतीय अभिनेत्री माधबी मुखर्जी यांचा जन्म.
१९४५ : राजेश पायलट केंद्रीय मंत्री (मृत्यू: ११ जून २०००)
१९७० : प्रसिद्ध भारतीय कवी कुमार विश्वास यांचा जन्म.
१९८५ : प्रसिद्ध गायिका महाथी यांचा जन्म

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६५ : हेन्रिक लेन्झ जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १२ फेब्रुवारी १८०४)
१९१२ : सर जोसेफ लिस्टर निर्जंतुकीकरणामुळे जखमा लवकर बर्या होतात हे सिध्द करणारा ब्रिटिश शल्यविशारद (जन्म: ५ एप्रिल १८२७)
१९२३ : विलहेम रॉँटजेन नोबेल पारितोषिकविजेते जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २७ मार्च १८४५)
१९८२ : नरहर कुरुंदकर विद्वान, टीकाकार आणि लेखक (जन्म: १५ जुलै १९३२)
१९९५ : प्रसिद्ध हिंदी साहित्यकार गुलशेर ख़ाँ शानी यांचे निधन.
२००१ : गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर जयपूर अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका (जन्म: १५ जुलै १९०४)
२०१२ : एच. आर. एल. मॉरिसन चे संस्थापक लॉईड मॉरिसन यांचे निधन. (जन्म: १८ सप्टेंबर १९५७)

# रासायनीक खतांना हिरवे खत उत्तम पर्याय



शेतीमध्ये होणाऱ्या रासायनिक खतांचा वापर यामुळे हल्ली मानवी आरोग्यावर परिणाम होताना दिसून येतो आहे. विशेषतः कर्करोगासारख्या आजारांना सहज निमंत्रण दिले जात आहे. जमिनी देखील सततच्या रासायनिक खतांच्या माऱ्यामुळे आपली सुपीकता गमावून बसल्या आहेत. जमिनीचा पोत खराब होताना दिसून येतो आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये याकडे गंभीर समस्या म्हणून पाहिले जात आहे. आणि यावर उपाय म्हणून सेंद्रिय खताला प्राधान्य दिले जात आहे. मात्र तरीही कमी कालावधीत अधिक पीक घेण्याच्या नादात बहुतांश रासायनिक खतांचा वापर दिसून येतो आहे. रासायनिक खतासाठीचा पर्याय अगदी सहज उपलब्ध असेल तर त्यांचा वापर नक्कीच कमी होवू शकतो. हिरवे खत हा रासायनिक खतांसाठी एक उत्तम पर्याय आहे. ज्यामुळे लागवडीचा खर्चही कमी येतो. आणि पीकही उत्तम आणि अधिक येते.

हिरवे खत म्हणजे दुसरे तिसरे काही नाही तर वेगाने वाढणारी पाने असणारी पिके होय. अशी पिके फळ येण्यापूर्वी नांगरणी करून जमिनीत दाबली जातात. हिरव्या खतामुळे जमिनीला नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, जस्त/झिंक, तांबे, मॅंगनीज आणि लोह इत्यादीचा सहज पुरवठा होतो. रासायनिक खतांसाठीच्या पर्यायामध्ये हिरवे खत सहज उपलब्ध करता येणारे, कमी वेळेचे आणि कमी खर्चिक आहे म्हणायला हरकत नाही. शेण, कंपोस्ट, हिरवे खत इत्यादी सेंद्रिय खतांचा वापर रासायनिक खतांना पर्याय म्हणून करता येतो. यापैकी हिरवे खत हे सर्वात सोपे आणि उत्तम साधन आहे. हिरव्या खतामुळे प्रामुख्याने जमिनीची गुणवत्ता सुधारते. पर्यायी जलधारण क्षमता वाढते. जमिनीचा पोत सुधारल्यामुळे जमितीतील विविध घटकांसोबत पिकाच्या उत्तम वाढीसाठी आवश्यक सूक्ष्मजीवांच्या संख्येतही वाढ होते. परिणामी जैविक क्रियांची वाढ होते. या खतांमुळे पिकामधील तण वाढत नाही.

हिरवे खत तयार करण्यासाठी वेगाने वाढणारी पिके घ्यावी लागतात. या पीकाची लागवड केल्यानंतर ३०-४० दिवसांनी हे खत मातीत घातले जाते. या पिकांची मुळे खोल तसेच पिकामध्ये वातावरणातील नायट्रोजनचे तर्कसंगत करण्याची क्षमता असणारी असणे देखील खूप गरजेचे असते. तसेच या पिकाची पाणी आणि पोषक द्रव्याची मागणी देखील कमी असणे आवश्यक असते.

खत बनविण्याची पद्धत : खत बनविण्याची पद्धत अगदी सोपी आहे. खतासाठी पेरलेले पीक ३०-४० दिवसांनी जमिनीत मिसळायचे. ते मिसळले की १०-१५ किलो युरिया फवारणी करायची ज्यामुळे रोपांचे विघटन लवकर होते. सूक्ष्मजीव त्याचे विघटन करतात. ज्याचा खत म्हणून पिकाला फायदा होतो. अर्थात पेरणी करण्यापूर्वी हिरवे खत मातीत घालायचे असते. हिरवे खत अधिक खोलवर मिसळू नये कारण हे पोषक तत्वांना खूप खोलवर दडपते. शेतात एका विशिष्ट टप्प्यावर पीक पलटी केल्यास तुम्हाला जास्तीत जास्त नायट्रोजनचा फायदा होतो. मसूर, मूग, उडीद, गवार, लोबिया इत्यादी पिके हिरव्या खतासाठी वापरली जातात.

# सीडलेस काकडीच्या लागवडीतून मिळतो मोठा नफा

अल्पावधीत फायदेशीर पिकांची लागवड करण्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. शेतकरीही या दिशेने उत्सुकता दाखवत आहेत. काकडी हे देखील असेच पीक आहे. या पिकाची लागवड वर्षातील कोणत्याही हंगामात थांबत नाही. अशा स्थितीत त्याची मागणीही बाजारात कायम आहे. दरम्यान, बाजारात सीडलेस काकडीची मागणीही झपाट्याने वाढत आहे. या जातीची पेरणी करून अल्पभूधारक शेतकरी चांगला नफा मिळवू शकतात.



पॉलिहाऊसच्या माध्यमातून करा लागवड :बीजविरहित काकडीची लागवड संकरित वाणांवर आधारित आहे. हॉलंडमधून या जाती देशात आणल्या गेल्या आहेत. सध्या देशातील अनेक राज्यांमध्ये या प्रकारची शेती केली जात आहे. ही काकडी वाढवण्यासाठी पॉलिहाऊसचा वापर केला जातो. येथे ते वर्षभर उगवले जाऊ शकतात, त्यांना कोणत्याही प्रकारचे परागण आवश्यक नसते.

मिळातो चांगला नफा :एक हजार चौरस मीटरमध्ये १००० सीडलेस काकडीची रोपे लावली जाऊ शकतात. अशा परिस्थितीत, एक शेतकरी १००० काकडीच्या रोपांपासून ४०० किलोपर्यंत उत्पादन सहज मिळवू शकतो. बाजारात विकूनही चांगला नफा मिळवू शकतो .

सीडलेस काकडी लागवडीसाठी वाण : सीडलेस वाण बहुतेक ग्रीन हाऊस किंवा पॉली हाऊसमध्ये लावले जातात, हे वाण गायनोकस आहेत आणि फळे मऊ, मऊ आणि जास्त उत्पादन देणारी आहेत.बीजविरहित वाण परागण न करता विकसित केले जातात, हे वाण नेदरलँड, तुर्की, इस्रायल आणि इतर युरोपीय देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकसित केले जातात, परदेशात सीडलेस वाण उन्हाळी हंगामासाठी सेरिंग आणि हसन आणि हिवाळ्यासाठी हसन आहेत.त्यासाठी मुहासन आणि दिनार मुख्य आहेत. मोठमोठ्या कंपन्या देखील भारतात या प्रकारचे बियाणे पुरवत आहेत, त्यापैकी नन-९७२९, नन-३०१९, यियान, पंजाब काकडी-१ प्रमुख आहेत.

यामुळे वाढत आहे मागणी : अलीकडच्या काळात काकडीची मागणी झपाट्याने वाढल्याचे दिसून येत आहे. आधीच ते सॅलेड आणि ज्यूस स्वरूपात वापरले जात होते.

आता रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने त्याच्या सेवनात मोठी वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत बिया नसलेल्या काकड्या चवीला कडू नसल्यामुळे लोकांच्या पसंतीस उतरल्या आहेत. त्यामुळेच इतर जातींच्या तुलनेत या काकड्यांचा दरही जास्त आहे.

# गव्हातील मावा घालवण्यासाठी असे उपाय करा

या वर्षी गहू पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव जास्त दिसून येत आहे. या किडीमुळे गहू पिकाचे वेगवेगळ्या प्रकारे नुकसान होते. किडीच्या प्रादुर्भावाची लक्षणे ही तांबेरा रोगाच्या लक्षणांप्रमाणे दिसतात. त्यामुळे बहुतांशी वेळा हा तांबेरा रोग असल्याचा समज होऊन त्या अनुषंगाने उपाय केले जातात. त्यासाठी प्रादुर्भावाची योग्य लक्षणे माहिती असणे आवश्यक आहे. जेणेकरून प्रभावी नियंत्रण करणे शक्य होईल.

अशी दिसते मावा कीड :मावा ही अतिशय छोटी कीड आहे. प्रौढ मावा कीड काळ्या रंगाची, तर पिल्ले पिवळसर काळ्या रंगाची असतात. कात टाकण्याच्या आधी कीड पांढरट रंगाची दिसते, पाठीवर पांढरे ठिपके दिसतात. किडीला सहा पाय असतात. पोटाच्या शेवटच्या टोकाला दोन टोके असतात. त्याला असे म्हणतात. याचा उपयोग स्वसंरक्षणासाठी होतो. डोक्यावर दोन डोळे व वरच्या बाजूला दोन मिशा असतात. तोंड हे टोकदार सोंडेसारखे असते. मावा कीड सोंड वनस्पतीच्या आतमध्ये टाकून रस शोषण करते. त्याला - प्रकारचे तोंड म्हणतात.

जीवनक्रम :मावा या किडीच्या दोन किंवा तीन अवस्था दिसून येतात. याला 'अपूर्ण रूपबदल' असे म्हणतात. यामध्ये पंख असलेले प्रौढ, पंख नसलेले प्रौढ, अंडी आणि पिले या अवस्था असतात. या किडी अंडी घालतात किंवा थेट पिलांना जन्म देतात.

प्रौढ : प्रौढ हे पंख असलेले किंवा पंख नसलेले असतात. जेव्हा कीड एकाच पिकावर असते, तेव्हा पंख नसलेले प्रौढ असतात. जेव्हा



एका पिकावरील अन्न अनुकूलता संपते, तेव्हा पंख असलेली अवस्था निर्माण होऊन कीड एका पिकावरून दुसऱ्या पिकावर जाते.अंडी : प्रतिकूल परिस्थितीमध्ये नर आणि मादी यांचे मिलन होऊन अंडी दिली जातात. हे अंडी प्रतिकूल परिस्थितीमध्ये तग धरून राहतात.

पिल्ले : पिले ही अंड्यातून निघतात किंवा प्रौढ थेट पिलांना जन्म देतात. पिले दिसायला प्रौढ किडी सारखेच असतात.

नुकसान : प्रौढ आणि पिले पानांतील रस शोषतात. : लक्षणे :किडीच्या प्रादुर्भावाची लक्षणे पीक लहान असल्यापासूनच दिसून येतात. सध्या पिकाच्या खालील पानांवर प्रादुर्भाव जास्त दिसून येतो. किडीच्या प्रादुर्भावामुळे पानावर पिवळसर चट्टे पडतात. पाने वाळून जातात. किडीचा रंग पिवळसर काळा असल्यामुळे पाने काळसर रंगाचे दिसू लागतात.

नियंत्रणाचे उपाय :नत्रयुक्त खतांचा अति वापर टाळावा. बिव्हेरिया बॅसियाना, मेटाऱ्हायझियम या सारख्या जैविक कीटकनाशकांची जमिनीवर फवारणी करावी. किंवा शेणखतात मिसळून वापर करावा. योग्य वेळेत थंडी असताना पेरणी करावी. लागवडीसाठी शिफारस केलेले सुधारित वाण वापरावेत. पिकास पाण्याचा ताण देऊ नये. वेळीच तण नियंत्रण करावे. नियंत्रणासाठी शिफारशीत रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा. मावा किडीचे नैसर्गिक शत्रू : मावा किडीला नियंत्रणात ठेवणारे अनेक मित्र कीटक निसर्गात आहेत. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी हे अतिशय महत्त्वाचे घटक असतात. या घटकांचे संरक्षण करणे गरजेचे असते. लेडी बर्ड बिटल - लेडी बर्ड बिटलचा प्रौढ प्रतिदिन ५० मावा कीड खातो. अळी रोज २०० ते ३०० मावा किडी खाते, एक लेडी बर्ड बिटल संपूर्ण आयुष्यात सुमारे दहा हजार मावा कीड खाते. क्रायसोपर्ला - क्रायसोपर्लाची एक अळी एका दिवसात ५०० ते ६०० मावा कीड खाते. या किडाला विळ्यासारखे दोन दात असतात. ते मावा किडीमध्ये अटकवून रसशोषण करते. हॉवर फ्लाय - या किडीची फक्त अळी अवस्था प्रतिदिन १०० ते ४०० मावा किडीचे भक्षण करते. प्रौढ माशी फुलांमधील मकरंद खाते. परजीवी गांधील माशी - या किडीला परजीवी वास्प म्हणतात. ही कीड मावा किडीच्या शरीरामध्ये स्वत: ची अंडी घालते, अंड्यातून निघणारी अळी मावा किडीला आतून खाते. त्यामुळे मावा कीड मरून जाते. नंतर ही आळी मावा किडीच्या शरीरात, कोष अवस्थेत जाते. त्यावेळी मावा कीड मोठी व फिक्कट तपकिरी रंगाची निर्जीव झालेली दिसते. काळ्या रंगाची निओझायगीट कुळातील बुरशी - ही बुरशी मावा किडीच्या शरीरावर वाढून रोग निर्माण करते. त्यामुळे मावा कीड मरते.

## थोडक्यात



### वैद्यराज शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन

अंबड : अंबड येथे वैद्यराज सितारामजी घुले ग्रामीण विकास व शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचालित वैद्यराज प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, अंबड वार्षिक स्नेहसंमेलनाचे कार्यक्रमाचे उदघाटन बदनापूर अंबड मतदारसंघाचे आमदार श्री. नारायण कुचे यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी उपस्थित अंबड नगरपरिषदेचे मा. नगराध्यक्ष देविदास कुचे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. मनोज उकिर्डे, संस्थेचे सचिव गंगाधर घुले , मुख्याध्यापिका सौ. घुगे मॅडम, रामकीसन घुगे , श्री. श्रीकांत जायभाये ,श्रीराम नागरे, नगरसेवक श्री. गंगाधर भैय्या वराडे, श्री. सौरभ कुलकर्णी, श्री. धर्मराज बाबर, बाळासाहेब तायडे, बाळू शहाणे, सुनील बिडे, युसूफ मणियार, रमेश बुंदेलखंडे, प्रकाश शेळके, विष्णू पुंड, लक्ष्मण राक्षे, सतीश कुलकर्णी, सर्व नगरसेवक, पदाधिकारी व विद्यार्थी, पालक व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पद्मजा पद्माकर कुलकर्णी यांचे निधन



बीड: शिरुर शहरातील रहिवासी पद्मजा पद्माकर कुलकर्णी (५५) यांचे रविवारी दुपारी निधन झाले. मागील काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. रविवारी उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. रविवारी रात्री शिरुर शहरातील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले गेले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### गंगाराम सरोदे यांचे निधन



मंठा : येथील टी व्ही ९ चे प्रतिनिधि संजय सरोदे आणि कल्याण सरोदे यांचे वडील गंगाराम आश्रोबा सरोदे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. प्रामाणिक आणि परिश्रमी सरोदे वीज वितरण कं चे सन्मान पात्र कर्मचारी होते. त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सूना नातवंडे असा परिवार असून त्यांच्या अंतिम संस्कार स्थानीय अमरधाम स्मशानभूमी मध्ये करण्यात आले. अंतिम संस्कार प्रसंगी सर्व स्तरातील गणमान्य उपस्थित होते.

### १२ वी विज्ञानसाठी शिष्यवृत्ती योजना

बीड : इयत्ता ११ वीमध्ये शिकत असलेल्या व १२ वीत जाणार्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'ज्ञानयश'च्या वतीने शिष्यवृत्ती योजना जाहीर केली असून एक वर्षभर विद्यार्थ्यांना जेईई आणि नीटचे मार्गदर्शन केले जाणार आहे. बीड जिल्ह्यात गुणवत्ता आहे अनेक क्षेत्रात विद्यार्थी पुढे जात आहे. मार्गदर्शना अभावी अनेकांना संधी मिळत नाही, गुणवंत विद्यार्थी स्पर्धेत टिकले पाहिजेत व यशस्वी झाले पाहिजेत. डॉक्टर, इंजिनिअर, नर्सिंग व इतर क्षेत्रात करिअर करु इच्छिणार्या विद्यार्थ्यांसाठी १२ वी विज्ञान चे मार्गदर्शन वर्गासाठी शिष्यवृत्ती योजना डॉ.पंडीत तुपे यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आल्या आहेत. बीड जिल्ह्यातील शेतकरी, कामगार व इतर क्षेत्रातील नागरिकांच्या पाल्यांसाठी ही योजना आहे.यामध्ये गणित, भौतिकशास्त्र, जिवशास्त्र रसायनशास्त्रचे मार्गदर्शन, तज्ञ प्राध्यापकामार्फत केले जाणार आहे यामध्ये १०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. तरी आपली नावे ज्ञानयश, कोकाटे हॉस्पीटलच्या शेजारी आदर्श नगर, बीड येथे नोंदवावीत अथवा ९८२२९९२८७५ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे आवाहन प्रा.पंडीत तुपे यांनी केले आहे.

### संत मीराबाई संस्थान येथे २७ जणांचे रक्तदान

पाटोदा: संत मीराबाई आईसाहेब यांच्या २७ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहा दरम्यान शनिवार ८ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीरात २७ दात्यांनी रक्तदान केले. सप्ताहाचे हे २७ वे वर्ष असुन महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार सेवा बजावत आहेत.

महंत राधाताई महाराज यांच्या मार्गदर्शनाखली शिव महापुराण कथा होत असुन भाविक मोठ्या संख्येने लाभ घेत आहेत. दररोज महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबीरासाठी स्वामी सानप, किसन सानप, शिवाजीराव गर्जे, विठ्ठल सांगळे, संतोष गर्जे यांनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. सप्ताहाची भव्य रक्तदान शिबीर गर्जे संत मीराबाई संस्थान या ठिकाणी क्तदान शिबिर संपन्न झाले. सांगता. राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे उपस्थित राहणार आहेत.




# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन रमाई जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतीन त्यागमुर्ती माता रमाई जयंती दि ७ फेब्रुवारी रोजी विविध उपक्रमाने मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाची शुरूवात सकाळी ९:०० वा. डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे त्यागमुर्ती माता रमाई यांच्या प्रतिमाचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करुन धम्मरॅलीची शुरुवात करण्यात आली व सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाऊ येथे धम्म रॅलीचा समारोप करण्यात आला तसेच १०वा पंचरंगी धम्म ध्वजा चे ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभेचे ता अध्यक्ष डॉ भागवत साळवे यांच्या हस्ते कण्यात आले.






तसेच सकाळी ठिक ११:०० वाजता व्याख्यान व दि २९ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत चालु आसलेल्या १० दिवशीय महिला उपासिका शिबीराचा समारोप कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली त्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा भारतीय बौद्ध महासभेच्या महिला शहर अध्यक्षा वंदनाताई घनघाव ह्या होत्या तर प्रमुख व्याख्यात्या म्हणुन भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हा अध्यक्षा तथा केंद्रीय शिक्षिका आद.कमलताई डोंगरे ह्या होत्या तर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ भागवत साळवे यांनी केले तर सुत्रसंचलन सिद्धार्थ वक्ते यानी केले तर या ठिकाणी महिला उपासिका शिबीरातील शिबीरार्थी वैशाली गायकवाड,सुमन भाग्यवंत,सिमा साळवे,अम्रपाली साळवे प्रज्ञा पाईकराव यांची मनोगते झाले त्या मध्ये त्यांनी धम्म चळवळीत सक्रिय राहुन भारतीय बौद्ध महासभेचे काम करण्याची ग्वाही दिली व शारदाताई टाकणखार यांनी रमाई यांच्या वेशभूषे तुन एकपात्री प्रयोग सादर केला तसेच १० दिवसीय महिला उपासिका शिबीरात १० दिवस प्रशिक्षण देणा-या केंद्रीय शिक्षक कमलताई डोंगरे यांचा शिबीरार्थी महिलांतर्फे कपड्याची भेट देऊन सत्कार करण्यात आला या ठिकाणी केंद्रीय शिक्षिका लिलाताई उजगरे व जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे यांनी शुभेच्छा दिल्या तर या कार्यक्रमास जिल्हा महिला सरचिटणीस शोभाताई भोजने,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, पर्यटन सचिव के व्हि साळवे ,एन बी राजभोज,जिल्हा संघटक बी सी डोंगरे,माजी उपाध्यक्ष गुलाबराव प्रधान,शहर अध्यक्ष एल आर मस्के सर,शहर उपाध्यक्ष नाथा घडसे,किसन भदर्गे,हे उपस्तीत होते तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गुलाब धाईजे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी एस साळवे, बाबासाहेब घनघाव,नितीन डोंगरे,भगवान डोंगरे,दयानंद साळवे,राजेभाऊ साळवे,भानदास साळवे,मोहन काकडे,बळीराम काकडे,डी पी पोटभरे,डी पी वाघमारे,मंदाताई साळवे,विशाखाताई वाघमारे,आशाताई मोरे,शारदाताई तांगडे,अनुराधा साळवे,मंडोधरी खंदारे,गणपत भालेराव तात्यासाहेब साळवे,सिद्धांत साळवे,यांच्या सह भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

## विद्यार्थिनींनी भयमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी परीक्षा केंद्रावर बुरखाबंदी अयोग्य -महमद खमरोद्दीन

बीड। प्रतिनिधी

दहावी आणि बारावीच्या परिक्षाणा बुरखा परिधान करुन येणार्या विद्यार्थिनींना परीक्षा केंद्रावर रोखण्याची मागणी राज्याचे मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी केली ही मुस्लिएम समाजाला लक्ष करणारी तसेच विद्यार्थीनींना शिक्षणापासून वंचित ठेवणारी असून मुस्लिम समाजातील दहावी, बारावी व इतर परीक्षेतील विद्यार्थीनींनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता भयमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी असे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमीटी, अल्पसंख्यांक विभाग, शहर अध्यक्ष महमद खमरोद्दीन यांनी केली आहे. मुस्लिम समाजातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थीनींनी बुरखा परिधान न करता परीक्षा केंद्रात यावे आणि परीक्षा द्यावी असे विधान ना.नितेश राणे यांनी केले आहे. त्यामुळे मुस्लिम सजातील दहावी, बारावीच्या विद्यार्थीनींना ऐन परीक्षा कालावधीत मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. मुस्लिमा करीता बुरखा



किंजवा स्कार्फ घालणे एक उपाणा आहे. संविधानाच्या उद्देशीकेत धर्माच्या आधारे भेदभाव करण्यास मनाई आहे. त्यामुळे परीक्षेच्या नियमाच्या नावाखाली शाळामध्ये बुरखा किंवा डोक्याचा स्कार्फ बंदी घालण्याची राणे यांची मागणी हा धर्मात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न आहे.

महायुती शासन एकीकडे महिलांच्या उन्नती करीता लाउकी बहीण योजना आणल्याचे सांगते, बेटी पढाव बेटी बचाव असा नारा देते. दुसरीकडे मंत्री बुरखा परिधान केला म्हणून बेटीला शिक्षणापासून वंचित ठेवण्याची मागणी करु शकते, महिला विरोधात द्वेषपूर्ण वातावरण निर्माण होईल अशी मागणी कशी करु शकते. ना.नितेश राणे यांनी शिक्षण मंत्र्यांना लिहिलेले पत्र हे केवळ मुस्लिम समुदायाला लक्ष करण्यासाठी लिहिले आहे. कॉपी मुक्तीच्या आडून अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा यामागे कुटील डाव दिसतो त्यांची ही मागणी शिक्षण क्षेत्रात धृवीकरण वाढू शकते अशी भती व्यक्त होत आहे. दहावी आणि बारावीची परीक्षा शैक्षणिक जीवनाची महत्वाची पायरी म्हणून ओळखली जाते आणि याच परीक्षेच्या तोंडावर ना.नितेश राणे यांनी बुरखा घालून येणार्या विद्यार्थीनींना परीक्षा केंद्रात बंदी करण्याची मागणी करण्याचे विधान केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहेत. ना.राणे यांची विधाने ही पुर्वीपासून आणि आतासुद्धा धार्मिक तेढ निर्माण करणारीच आहेत. आतातर त्यांनी थेट मुस्लिएम समाजातील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींनाच टार्गेट केले आहे. त्यामुळे विद्यार्थिनींनी घाबरुन न जाता भयमुक्त वातावरणात दहावी आणि बारावीची परीक्षा द्यावी असे महमद खमरोद्दीन यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## अंबलटेक येथील दोन युवकांचा अपघात नसून घातपातचा संशय

घाटनांदुर। प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील अंबलटेक येथील दोन युवकांचा रविवार, दि २ फेब्रुवारी रोजी मध्ये रात्री घाटनांदुर-तेलघना रोडवर टेम्पोचा अपघात झाल्याची घटना मयत युवक अजय विश्वनाथ गुट्टे व ऋषिकेश नारायण केदार या दोघांचा अपघात होऊन मृत्यू झाल्याची घटना घरी कळवण्यात आली होती मात्र या दोघांच्याही मयत कुटुंबातील नातेवाईकांनी पोलीस स्टेशन अंबाजोगाई ग्रामीण या ठिकाणी दि ५ फेब्रुवारी रोजी अर्जाद्वारे लेखी तक्रार करून मयत दोन्ही युवकांचा अपघात नसून घातपात झाल्याचा आरोप नातेवाईकांकडून आरोप करण्यात आला आहे या मयत युवकांना संशयित व्यक्तींनी दवाखान्यात नेऊन पळून गेले असे मयत कुटुंबाला माहिती समजल्यामुळे संशयत व्यक्तींना विचारणा केल्यास उडवा उडवी चे उत्तरे देत असल्यामुळे दोन्ही मयत युवकांच्या कुटुंबाने या घटनेचा अपघात नसून या



दोन्ही युवकांचा घात पात झाल्याचा संशय मयत युवक अजय गुट्टे यांचे चुलते नारायण महादेव गुट्टे व मयत ऋषिकेश केदार यांचे भाऊ उमेश नारायण केदार या दोन्ही मयत युवक व्यक्तीच्या नातेवाईकांनी पोलीस स्टेशन अंबाजोगाई ग्रामीण याठिकाणी अर्जाद्वारे तक्रारीची सखोल चौकशी करून संशयित व्यक्तीवर गुन्हे दाखल करावा.असे मयत व्यक्तींच्या नातेवाईकातून सांगण्यात आले आहे .

## सार्वजनिक शिवजयंती उत्सव अध्यक्षपदी अशोक वाणी ;उपाध्यक्षपदी महेश ढवळे



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात दि. ८ फेब्रुवारी शनिवार रोजी सरपंच बालासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व उपसरपंच बाळकृष्ण थोरात,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, डॉ . गणेश ढवळे, विक्रांत वाणी, संतोष भोसले, सुरेश निर्मळ,बाळकृष्ण मुळे,शंकर वाणी, पप्पू आवसरे ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात,अक्षय वाणी, अशोक जाधव, , समीर शेख, रमेश गायकवाड,यांच्या उपस्थितीत प्रतिवर्षी प्रमाणे सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ गठीत करण्यात आली यावेळी नवनिर्वाचित समितीमध्ये अध्यक्षपदी अशोक वाणी, उपाध्यक्ष महेश ढवळे, सचिव सौरभ जाधव, सहसचिव दिनेश जाधव, कोषाध्यक्ष अशोक जाधव, सल्लागारपदी तुकाराम गायकवाड,वसीम शेख यांची तर सदस्यपदी महावीर वाणी, अभिजित गायकवाड, महावीर जाधव,औदुंबर नाईकवाडे,अभय वनवे, नितीन जाधव, सुभाष वाणी,बाबु शिंदे, ओंकार तागड, विक्की भोसले,अक्षय येडे ,अक्षय ढवळे, विजय आगवान,अमर आबदार, स्वप्निल वक्ते यांची निवड करण्यात आली.प्रास्ताविकात सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी मागील संपूर्ण वर्षभरात शिवजयंती उत्सव समितीकडुन झालेल्या कार्यक्रमांची संक्षिप्त स्वरूपात माहिती देत शिवजयंती उत्सवाची रूपरेषा आणि उत्सवाला अभिप्रेत असणा-या बाबी मांडल्या. डॉ.गणेश ढवळे यांनी गतवर्षी प्रमाणेच डीजेमुक्त शिवजयंती साजरी करत विविध पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन पोलिस प्रशासनाला सहकार्य करत आदर्शवत शिवजयंती साजरी करण्याचे आवाहन केले.यावेळी ग्रामपंचायत्या वतीने अध्यक्षपदी निवड झालेले अशोक वाणी व ईतर पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित ग्रामस्थांकडून निवडीचे स्वागत करण्यात आले.

# काठीचा आधार घेत सायमा टाकतेय एक-एक पाऊल

### आवाहनाला प्रतिसाद दानशूरांनी १ लाख ३५ हजांची केली मदत

पाटोदा । प्रतिनिधी

उपचाराअभावी अंपगत्व आलेल्या सायमा बेग हिच्यावर पुणे येथील संचेती हॉटेलमध्ये उपचार सुरू असुन तिच्या प्रकृतीमध्ये चांगला सुधार होत आहे

सायमाचे वडील हे सालगडी असुन त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने योग्य उपचार करू न शकल्याने सायमाला अंपगत्व आले होते.ही गंभीर बाब लक्षात येताच सय्यद शफाउद्दीन तसेच पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख यांनी उपचारासाठी लोकसहभागाचे आवाहन केले असता आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळत असुन बीड जिल्ह्यासह विविध ठिकाणच्या दानशूरांनी आत्तापर्यंत १ लाख ३५ हजारांची मदत केली असून अजुनही मदतीचा ओघ सुरू आहे.

सायमा ही ९ वर्षांपासून अंथरुणातच असल्याने शरीरावर याचे दुष्परिणाम झाल्याने काही भागावर जखमा झाल्या आहेत त्यामुळे तिच्यावर करण्यात येणाऱ्या उपचाराला बांधा येत असून सध्या त्या जखमावरच उपचार होत असून लवकर जखमां बऱ्या झाल्या नाही तर तेथेही सर्जरी करावी लागणार असल्याचे



उपचाराअभावी अंपगत्व येणं ही दुर्दैवी बाब असुन बेग कुटुंबाने घटनेची वाच्यता लवकर जाहीर केली असती तर सायमा ९ वर्षे संघर्ष करावा लागला नसता तरी जी मदत बेग कुटुंबाला लागेल ती करू

**मा.जि.प.अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला**

डॉक्टरांनी सांगितले आहे.एकुणच लोकसहभागातून मुलीवर उपचार होत असुन लोकही त्याला भरभरून प्रतिसाद देत असल्याने लोकसहभागाच्या काठीचा आधार घेत सायमा एक-एक पाऊल पुढे टाकत आहे. घटनेची गंभीरता पाहुन मा.जि.प.अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला यांनी सय्यद शफाउद्दीन, पत्रकार जावेद शेख यांच्यासह सायमा बेग कुटुंबाची यांची भेट घेतली तसेच आम्ही सर्व आपल्या सोबत आहोत असा धीर देत संचेती हॉटेलचे प्रमुख मा.डॉ.पराग संचेती यांच्याशी संवाद साधत उपचाराचा आढावा घेतला

# कुठलेही दडपण न टाकता मुलांना हसत खेळत शिकू द्या-विशाल खांबे

अंबड। प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक स्नेह संमेलनासारखे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम उपयुक्त ठरतात.तसेच पुस्तकी अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी विविध कला,छंद जोपासावेत असे आवाहन करतांनाच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कौतुकास्पद काम महात्मा फुले इंग्लिश स्कुल नेहमीच करत असते.पालकांनी दडपण न आणता मुलांना हसत खेळत शिकू द्यावे असे मत अंबडचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांनी व्यक्त केले. अंबड शहरातील महात्मा फुले व स्मार्ट किडस वर्ड इंग्लिश स्कुलच्या आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल खांबे यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी ते बोलत होते.




या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून एसबीआय बँकेचे शाखाधिकारी कैशीक चौधरी, केदार कुलकर्णी,भाजपा जेष्ठ नेते डॉ.राजेंद्र ठोसर, चंद्रशेखर मोहरीर, कुमार रुपवते, सौरभ कुलकर्णी, संतोष जिगे,हरीश्चंद्र सोळुंके,केंद्र प्रमुख माने सर ,बाजार समिती संचालक केदार राठी,श्रीमंत खरात,सुहास सोडाणी,अजीज बेग आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे म्हणाले की, कोणत्याही मुलाची पहिली शाळा हे त्याचे घर असते आणि पहिले शिक्षक हे त्याचे पालक असतात. सुरुवातीच्या काळात कोणतेही मूल आपल्या पालकांकडूनच सर्व कामे करायला शिकते, जर तुम्हाला तुमच्या मुलाचे भविष्य चांगले घडवायचे असेल तर त्यांना नेहमीच चांगले शिक्षण द्या. आजच्या पालकामध्ये शिक्षणाविषयी आवड आहे त्यामुळे प्रत्येक पालक आपल्या मुलांकडून काही तरी आपेक्षा धरुन आहे मात्र पालकांनी आपल्या मुलांवर जास्त दडपण न टाकता त्यांला मुक्त पणे त्यांच्या मनाप्रामाणे जगू दिले पाहिजे,हे वय मुलांचे खेळण्या बागडण्याचे आहे त्यामुळे मुलांना हसत खेळत शिकू द्या असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी भारतीय स्टेट बँकेचे शाखाधिकारी कैशिक चौधरी व भाजपाचे जेष्ठ नेते डॉ.राजेंद्र ठोसर यांनीही मौलिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात संस्थाध्यक्ष गिताराम मते यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा मांडला तसेच विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्याचे काम आम्ही असेच प्रामाणिकपणे करत राहू अशी ग्वाही दिली. यावेळी वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात देवा श्री गणेशा,सोशल मिडिया नाटक,फनी डान्स, देशभक्तीपर गाणे,खंडेराया झाली माझी दैना अशी अनेक गाणे विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे सादर केली.

यामध्ये शिवराज्याभिषेक तसेच देशाच्या एकात्मतेवरील नृत्यकला लक्षवेधी ठरल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या सविता मते,आश्विनी जाधव,शिला जाधव, आश्विनी जानवे, शबनम शेख,साधना शिंदे,गायत्री पाटील,कोमल देवडे,अहिल्या सावजी,वैष्णवी गायकवाड,वैभवी पडूळ यांच्यासह बाबासाहेब जावळे,शिवराज मते,दिपक कोरडे,सागर परदेशी,सुरज राऊत, श्रेयस धांडे,हंसराज मते,संजय परदेशी आदींनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह विद्यार्थी व पालकांची मोठी उपस्थिती होती.

राज्य लोकतंत्र
सोमवार, दि.१० फेब्रुवारी २०२५ | ६

# सर्व डॉक्टरांनी आपल्या तंदुरुस्तीची काळजी घ्यावी -डॉ राजेश इंगोले

अंबाजोगाई प्रतिनिधी

अंबाजोगाई मेडीकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या अँपा डॉक्टर्स महिला चषक स्पर्धेत रॉयल फायर्स संघाने विजेतेपद पटकावले तर योगेश्वरी चॅम्पियन्स संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

विजेत्या व उपविजेता संघास इंडीयन मेडीकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतीक समिती अध्यक्ष डॉ राजेश इंगोले, अँपा संघटनेच्या अध्यक्षा डॉ सुलभा पाटील, उपाध्यक्ष डॉ सुनील नांदलगावकर,सचिव डॉ ऋषिकेश घुले,डॉ संदीप जैन,डॉ मनीषा पवार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.



डॉक्टर्स महिला क्रिकेट चषक स्पर्धा अंबाजोगाई

यावेळी बोलताना डॉ राजेश इंगोले यांनी डॉक्टर्स आपल्या व्यस्त आयुष्यात आपल्या अनेक आवडी निवडी विसरून जातात. प्रत्येक डॉक्टरमध्ये एक व्यक्ती म्हणून आपली आवड आपले छंद असतात. कुणी छान खेळ खेळतात, कुणी छान चित्रकार असतो, कुणी छान गायक, नर्तक नर्तिका, कलाकार, फोटोग्राफर असतात पण वैद्यकीय सेवा क्षेत्रात उतरल्यावर वेळेअभावी डॉक्टर्स मधील या अभिव्यक्ती लोप पावतात. अँपा डॉक्टर्स असोसिएशनच्या कर्तबगार महिला अध्यक्ष डॉ सुलभा पाटील यांनी प्रथमच अभिनवरीत्या डॉक्टर्स साठी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करून डॉक्टर्समधील खेळाडूला जागृत केलं आहे याबद्दल त्यांचे आभार मानले. सर्व डॉक्टर्सनी आता हा जागृत झालेला खेळाडू आता लोप पावू न देता वर्षभर आपला शारीरिक फिटनेस कायम राखावा असे आवाहन केले. आपला व्यवसाय आपले पोट भरतो पण कलाक्रीडा कौशल्य आपलं जीवन जगणं समृद्ध करत आयुष्याला अर्थ देतात. त्यामुळे प्रत्येकाने आपली कला ,आपले छंद आयुष्यात जोपासून प्रत्येक क्षणाचा आनंद घ्यायला शिकावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

अँपाच्या अध्यक्ष सुलभा पाटील यांनी या क्रीडा स्पर्धा प्रत्येक डॉक्टर्सला नवचैतन्य, नवी ऊर्जा देण्याचं काम करत आहेत असे सांगत आपल्या अध्यक्षतेखाली डॉक्टर्स साठी यापुढेही आता विविध सांस्कृतिक आणि इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल असे सूतोवाच करत विजेत्या व उपविजेत्या संघाचे अभिनंदन केले. रॉयल फायर्स या विजेत्या संघाच्या कर्णधार डॉ प्रिया नागरगोजे तसेच योगेश्वरी चॅम्पियन्स या उपविजेत्या संघाच्या कर्णधार डॉ स्वाती हारे यांना डॉ राजेश इंगोले यांच्या हस्ते अँपा चषक देऊन गौरविण्यात आले तर या सामन्यात फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात उत्कृष्ट कामगिरी बजावत आपल्या फायर्स संघाला विजेतेपद मिळवून देणाऱ्या डॉ योगिनी नागरगोजे यांना सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


या सामन्यासाठी पंच म्हणून बिंबिसार वाघमारे व संघर्ष इंगळे,स्कोरर म्हणून चाफा भडके व प्रा अनंत कांबळे तर समालोचक म्हणून डॉ देवराव चामणर,डॉ सचिन कस्तुरे, डॉ संदीप जैन यांनी कामगिरी बजावली. योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानात सुरू असलेल्या ह्या क्रिकेट स्पर्धा अत्यंत जल्लोषात व उत्साहात पार पडल्या.

# शॉर्टसर्किटने आग लागून संसारोपयोगी साहित्य भस्म

दिंद्रुड । प्रतिनिधी

घराला शॉर्टसर्किटने आग लागून संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना माजलगाव तालुक्यातील बडेवाडी येथे शनिवारी रात्री बारा वाजे दरम्यान घडली.





बडेवाडी येथील घटना

बडेवाडी येथील मोहन नामदेव तिडके यांच्या घराला शनिवारी रात्री घरात सर्व झोपेत असताना विजेचे शॉर्टसर्किट होऊन आग लागली. या आगीत भांडे,कपडे, धान्य,महत्त्वाची कागदपत्रे, नुकतेच कापूस विकून आलेले एक लाख रुपये, सोन्याची दागिने असे जवळपास दोन लाखांचे नुकसान या आगीत भस्म झाले. स्थानिकांनी तात्काळ धाव घेत विज आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत सर्व काही जळून खाक झाले होते. यामुळे तिडके कुटुंब निराधार व निरश्रीत झाले आहे, दरम्यान रविवारी नित्रुड महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी शिंगणवाड व तलाठी सुप्रिया नांदे यांनी बडेवाडी येथे भेट देऊन पंचनामा केला. स्थानिकांनी पीडित कुटुंबाला तात्काळ प्रशासकीय मदत मिळवून देण्याचे आवाहन केले आहे.

# माणसाने धनसंपत्ती कमविण्यापेक्षा सतंतीवर चांगले संस्कार करावेत -आचार्य भगवंत महाराज पुरी

माजलगाव । प्रतिनिधी

आयुष्यात माणसाने धन संपत्ती कमविण्यापेक्षा सतंतीवर चांगले संस्कार करावेत जेणेकरून त्यांचे आयुष्य ते सोयीस्करपणे जगू शकतात असे आवाहन गेवराई तालुक्यातील भाटेपुरी पंचमुखेश्वर संस्थानचे आचार्य भगवंत महाराज पुरी यांनी आडोळा येथील भागवत सप्ताहातील भागवतकथा प्रसंगी भाविकांना केले



माजलगाव तालुक्यातील आडोळा येथे दि ०५ फेब्रुवारी पासुन सर्व जातीय व धर्मीय भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असुन या भागवत सप्ताहाची दैनंदिन कार्यक्रम पाहटे ४:०० ते ६:०० वाजता काकडा भजन, सकाळी ०७:०० ते १०:०० वाजता ज्ञानेश्वरी पारायण,११:०० ते १२:०० वाजता गाथा भजन,दुपारी १:३० ते ४:३० वाजता संगीत भागवतकथा,कथावाचक गेवराई तालुक्यातील भाटेपुरी येथील पंचमुखेश्वर संस्थानचे आचार्य भगवंत महाराज पुरी यांच्या अमृतमय वाणीतुन भाविकांना मंत्रमुग्ध करताता,तर संध्याकाळी ६:३० ते ७:३० वाजता हारीपाठ,रात्री ८:३० ते १०:०० यावेळेत महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांचा भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन दि १२ फेब्रुवारी बुधवारी रोजी काल्याचे किर्तन यशवाडी संस्थानचे श्री १००८ आचार्य श्री स्वामी शिवेंद्र चैतन्य महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार असुन काल्याच्या किर्तना नंतर आडोळा येथील सर्व जातीय व धर्मीय ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले असुन आडोळा परिसरातील सर्व भाविक-भक्तांनी संगीत भागवत कथेचा,भव्य किर्तन महोत्सवाचा, तसेच काल्याच्या किर्तनाचा महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आडोळा येथील सर्व जातीय व धर्मीय ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंबाजोगाईत घरफोडी; साडेचार लाखांचे दागिने व रोख रक्कम चोरीला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील विमलसृष्टी परिसरात एका घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सुमारे साडेचार लाख रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी गणपती सुरेशराव बुरगे यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

गणपती बुरगे हे आपल्या पत्नी शिल्पासह विमलसृष्टी येथे वास्तव्यास आहेत. त्यांचे अंबाजोगाई शहरात सॅमसंग मोबाईल विक्रीचा व्यवसाय आहे. दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजता ते महमदापुर येथे गेल्यानंतर घरी कोणी नसल्याने घराला कुलूप लावून गेले होते. त्यांची पत्नी शिल्पा बुरगे ही परीक्षा देण्यासाठी पुण्याला गेली होती. ७ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजता घरी परतल्यावर



त्यांना घराचा कोंडा तुटलेला दिसला. दरवाजा आतून बंद असल्याने त्यांनी मागील दरवाज्यातून प्रवेश केला असता, घरातील कपाटातील वस्तू अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. वरच्या मजल्यावरील बेडरूममधील कपाटातील लॉकर फोडून चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली होती. चोरीला गेलेल्या वस्तूंचे अंदाजे मूल्य ४ लाख ५० हजार रुपये असून त्यामध्ये पाच तोळे सोन्याच्या बांगड्या, पाच तोळे सोन्याची साखळी, ५ ग्राम सोन्याची अंगठी आणि रोख ३० हजार रुपये असल्याचे गणपती बुरगे यांनी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत नमूद आहे. पोलीसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. चोरट्यांनी ३ ते ७ फेब्रुवारी दरम्यान घर फोडून चोरी केल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या चोरीप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहे.

# मोठेवाडी सोसायटीच्या चेअरमनपदी संभाजी चव्हाण तर व्हा. चेअरमनपदी दिगंबर राठोड

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सेवा सहकारी सोसायटी मोठेवाडी, छोटेवाडी,रामनगर या तीन गावच्या चेअरमन पदी संभाजी चव्हाण यांची तर व्हा चेअरमन पदी दिगंबर राठोड यांची दि ०९ फेब्रुवारी रविवार रोजी बिनविरोध निवड करण्यात आली.



मोठेवाडी येथील सेवा सहकारी सोसायटीच्या कार्यालयात निवडणूक अधिकारी एस.डी.नेरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत रिक्त जागेसाठी चेअरमन पदी संभाजी शिवाजीराव चव्हाण यांची तर व्हा. चेअरमन पदी दिगंबर राठोड यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

चेअरमन पदासाठी सूचक म्हणून भगवान पवार यांनी तर अनुमोदक म्हणून राजेभाऊ घोडके यांनी स्वाक्षरी केली .तर व्हॉइस चेअरमन पदासाठी सुचक म्हणून रामराव खेत्री यांनी तर अनुमोदक म्हणून भानुदास राठोड यांनी स्वाक्षरी केली. याप्रसंगी सचिव भिमराव सोळंके, तलाठी लक्ष्मण सोन्नर,संचालक प्रभाकर पास्टे,जनार्दन गोंडे,बाबुराव वराडे,श्रीकृष्ण कटके, संभाजी पौळ व माजी सरपंच अविनाश गोंडे,अंगदराव कटके,भाई ॲाड.नारायण गोले,अशोक पास्टे, दत्तात्रय चव्हाण,भारत खेत्री,पत्रकार राजाभाऊ पास्टे, संभाजी पास्टे, अंगद खेत्री, दत्तात्रय तपसे, ॲाड. पांडुरंग गोंडे, भगवान रोकडे, वैजनाथ कटके,अनिल मुळाटे,अशोक रासवे, भारत पास्टे,गजानन गोंडे,हनुमान नावडकर,आदी उपस्थित होते. नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# अभिषेक नाईक व गणेश देवगुणे यांची मुंबई पोलीस पदी निवड



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील पारगांव जोगेश्वरी येथील रहिवासी असणारे अभिषेक नाईक व गणेश देवगुणे यांची मुंबई पोलीस पदी निवड झाली आहे. आज आलेल्या २०२४-२५ च्या अंतिम निवड यादीत या दोघांचेही नाव आले आहे.

अधिक माहिती अशी पारगांव जोगेश्वरी येथील रहिवाशी असलेले अभिषेक नाईक व गणेश देवगुणे यांची मुंबई पोलीस म्हणून निवड झाली आहे. पोलीस किंवा सैनिक बनण्यासाठी विद्यार्थी रात्र दिवस अभ्यास करत असतात त्याचबरोबर पहाटे उठून मैदानी चाचणी चा सराव करावा लागतो. शांत संयमी असणाऱ्या अभिषेक व गणेश ने अभ्यासाबरोबरच ◀◀ पान ३ वर

# राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी तोष्णीवाल

**आ. विजयसिंह पंडित यांनी केली घोषणा**

गेवराई । प्रतिनिधी

आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सालाबादाप्रमाणे यावर्षी ''राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ चे थाटात आयोजन करण्यात येत असून या सोहळ्याची कार्यकारणी आ. विजयसिंह पंडित यांनी जाहीर केली असून कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी शैलेश तोष्णीवाल तर कार्याध्यक्षपदी संदिप मडके यांची निवड करण्यात आली आहे. सर्व पदाधिकारी व सदस्यांचे स्वागत आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे



राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा नूतन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्षपदी संदिप मडके

सहकार्याध्यक्षप्पदी संतोष सुतार, उपाध्यक्षपदी अँड मनोज हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल

सचिवपदी राहुल मस्के, सहसचिवपदी शहादेव निकम, कोषाध्यक्षपदी पप्पू पठाण, सह कोषाध्यक्षपदी रणजित घुंबार्डे यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचे आ. विजयसिंह पंडित यांनी सत्कार करुन अभिनंदन केले आहे.

# श्री विश्वकर्मा जयंती मिरवणूक उत्सवास समाज बांधवांनी उपस्थित राहा-पांचाळ,दिगंबरे

माजलगांव । प्रतिनिधी

येथील श्री संत ज्ञानेश्वर नगर ,नवीन वसाहत भटवडगाव येथे दि १० फेब्रुवारी २०२५ रोजी श्री विश्वकर्मा जयंती व भव्य अशी मिरवणूकी उत्सवाचे आयोजन श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटना व श्री विश्वकर्मा विठ्ठल -रुक्मिणी प्रतिष्ठान मंडळाच्या वतीने करण्यात आले असून या जयंती उत्सवात समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आव्हान तालुका अध्यक्ष परमेश्वर पांचाळ राजाभाऊ पांचाळ,अशोक दिगंबरे यांनी केले आहे.

भक्तांना कळविण्यात येते की, श्री विश्वकर्मा प्रभुच्या कृपेनेचा आशिर्वादाने व गुरच्या प्रेरणेने आणि सर्व भाविक भक्तांच्या सहकार्याने याही वर्षी श्री विश्वकर्मा व विठ्ठल - रुक्मिणी मंदिर श्री संत ज्ञानेश्वर नगर, नविन



वसाहत भाटवडनाव येथे सोमवार दि १० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते १२ श्री विश्वकर्मा जयंती व भव्य मिरवणुक उत्सव सोमवार रोजी होईल आणि लगेच महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

कार्यक्रमाची रूप रेषा अशी आहे माऊली दादा वारकरी शिक्षण संस्था, ◀◀ पान ३ वर

# पाचरट कादंबरीचे आमदार सुरेशआण्णा धस यांच्या हस्ते प्रकाशन सोहळा संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पारगाव घुमरा येथील प्रसिद्ध लेखक अशोक नजान सर यांनी ऊसतोड मजुरांच्या आयुष्यातील व्यथा, खडतर परिस्थिती व आव्हानांचे वर्णन करणारी 'पाचरट' ह्या कादंबरीची रचना केली आहे. या कादंबरीचा प्रकाशन सोहळा ह.भ.प.गुरुदेव महादेवानंद भारती महाराज, आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. लेखक अशोक नजान सर यांनी विविध वर्तमानपत्रासाठी अनेक लेख लिहिले आहेत. दैनिक सकाळच्या मैफल पुरवणीत देखील त्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. आपल्या जिल्ह्यातील साहित्यिक



येणाऱ्या अधिवेशनात कामगार महामंडळात झालेल्या बोगस कामगार नौदणीची फेर तपासणी लावुन दोषी अधिकारी, ग्रामसेवक, कॉन्ट्रॅक्टदारांनावर कठोर कारवाई करण्यास भाग पाडणार - आमदार सुरेश धस

म्हणून त्यांचा निश्चितच अभिमान आहे. मराठी साहित्यासाठी त्यांच्याकडून पुढील काळात देखील विपुल दर्जेदार साहित्य निर्माण व्हावे हिच सदिच्छा व शुभेच्छा आमदार धस यांनी दिल्या 'पाचरट' कादंबरी कादंबरी नक्कीच वाचकांच्या पसंतीस उतरेल. सर्वांनी ◀◀ पान ३ वर

# आई-वडिलांच्या काबाडकष्टाला बहिण-भावाची पोलीस वर्दीची सलामी

**वडगाव गुंधा येथील सोनाली व शरद डोंगरे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव**

वडवणी । प्रतिनिधी

मुलांनी शिक्षण घेत असताना जिद्द, परिश्रम,कष्ट,चिकाटी आणि या सर्वांमध्ये आपल्या डोळ्यासमोर सातत्य ठेवून.ऊन- वारा,पाऊस-थंडी यामध्ये आपले आई- वडील करीत असलेले काबाडकष्ट, परिश्रम.याची सतत जाणीव ठेवून अपयशांच्या पायऱ्या चढत .यशाची पायरी चढल्याशिवाय मागे हटायचं नाही अशी मनाशी खून गाठ बांधून.वडगाव गुंदा ता.जि.बीड येथील रावसाहेब श्रीरंग डोंगरे या कुटुंबातील शरद आणि सोनाली या बहिण भावाने अखेर महाराष्ट्र पोलीस दला मध्ये दाखल होत.अलौकिक अशा यशाला गवसणी घातली आहे.एक ते दीड वर्षांपूर्वीच रावसाहेब डोंगरे यांचा मोठा मुलगा शरद डोंगरे यांची ठाणे पोलीस दलामध्ये निवड झाली.तर मुलगी सोनाली



डोंगरे या मुलीची सुद्धा काल मुंबई पोलीस दलामध्ये निवड झाली असून. रावसाहेब डोंगरे यांचे दोन्हीही अपत्य महाराष्ट्रातील जनतेच्या संरक्षणार्थ महाराष्ट्र ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...



# तोरणा किल्ल्यावर पर्यटकाचा हृदयविकाराने मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

सह्याद्रीच्या गड-किल्ल्यांवर पर्यटनासाठी जाणाऱ्या पर्यटकांनी विशेष काळजी घेण्याची गरज आहे, असे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. पुण्यातील दोन पर्यटक शनिवारी सायंकाळी तोरणा किल्ल्यावर गेले होते. मात्र, त्यापैकी रणजित शिंदे यांना अचानक श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. त्यांच्या सोबतीने असलेल्या मित्रांनी त्यांना मंदिरात नेले, परंतु तिथेच त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर त्यांच्या सोबतीच्या व्यक्तीने पोलिस आणि रेस्क्यू टीमला संपर्क केला. एस.एल. डव्हेंचर टीमचे सदस्य आणि स्थानिक बचाव पथकाने तातडीने मदतीसाठी धाव घेतली. रेस्क्यू एक्सपर्ट लहू दादा आणि त्यांचे सहकारी खानापूरहून आवश्यक बचावसाहित्य (रोप, स्ट्रेचर, हेड टोर्च) घेऊन पाबे घाट मार्गे घटनास्थळी रवाना झाले. दरम्यान, शिवापूरहून कौस्तुभ आणि त्यांचे सहकारी



प्रशांत इंगुलकर, ऋषिकेश इंगुलकर आणि सचिन शेलार यांनीही मदतीसाठी पुढाकार घेतला. ते सर्वजण तोरण्याच्या बेसला पोहोचले आणि पोलिस अधिकारी युवराज सोमण यांच्याशी चर्चा करून गड चढण्यास सुरुवात केली गडाच्या महादरवाज्याजवळ पोहोचल्यावर स्थानिक गावकरी आणि तानाजी भोसले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पार्थिव खाली आणण्याचा प्रयत्न सुरू केला होता. मात्र, हा मार्ग अत्यंत कठीण असल्याने त्यांना मदतीची गरज होती. रेस्क्यू टीमने रोपच्या मदतीने स्ट्रेचर व्यवस्थित बांधले आणि पार्थिव हलू नये म्हणून योग्य ते उपाय केले. ऋषिकेश, प्रशांत आणि गावातील अन्य सदस्यांनी समोरील बाजू तर लहू दादा, सचिन शेलार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मागील बाजू सांभाळत गडाचा कठीण टप्पा पार केला.

सुमारे ८० ते ८५ किलो वजनाचे पार्थिव अशा दुर्गम ठिकाणाहून खाली आणण्यासाठी प्रचंड मेहनत, कौशल्य आणि टीम वर्क आवश्यक होते. मोठ्या धाडसाने रेस्क्यू टीमने ही जबाबदारी पार पाडली. अखेर सकाळी ४ वाजता पार्थिव बेसला पोहोचवण्यात आले आणि अँब्युलन्स व डॉक्टरांच्या ताब्यात देण्यात आले.

**पर्यटन करताना काळजी घेण्याचे आवाहन**

सर्व रेस्क्यू सदस्य आणि पोलिस वेल्हे पोलिस स्टेशनमध्ये पोहोचले आणि संपूर्ण घटनेचा आढावा घेतला. सह्याद्रीच्या कडेकपारीत फिरताना योग्य तयारी, वैद्यकीय स्थितीची काळजी आणि सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले. एका चुकीच्या निर्णयामुळे संपूर्ण आयुष्य संपून जाते. आपल्या घरी आपले कुटुंबीय वाट पाहत असतात. सह्याद्रीत भटकंती करताना सुरक्षेच्या सर्व उपाययोजना कराव्यात, असे रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी सांगितले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या वाढदिवसानिमित्त श्रीमंत दगडूशेठ गणपतीला ६१ किलो लाडू केले अर्पण

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे शहर शिवसेनेच्या वतीने पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात विशेष महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ६१ किलोचा मोदक बाप्पाला अर्पण करण्यात आला.





उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त शिवसेना शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांच्या वतीने गणरायाला ६१ किलो मोदकाचा लाडू अर्पण करण्यात आला. यावेळी एकनाथ शिंदे यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि महाराष्ट्राच्या समृद्धीची प्रार्थना करण्यात आली. याशिवाय शिवसेनेतर्फे आज संपूर्ण शहरात 'कॉमन मॅन दिवस' साजरा करीत रक्तदान शिबिरे, मोफत आरोग्य तपासणी, अन्नदान, वृक्षारोपण आणि विशेष महाआरतीसह विविध उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. या विशेष सोहळ्याला पुणे शहरातील शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी ,गणेश भक्त, महिला आघाडी, युवा सेना, नागरिक, पदाधिकारी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिवसेना शहरप्रमुख पुणे प्रमोद नाना भानगिरे, सुदर्शनाताई त्रिगुनाईत ,सुरेखा पाटील,श्रुती नाझिरकर,सुनील जाधव, सुधीर कुरुमकर, गौरव साईनकर,गणेश काची, नवनाथ निवंगुने, नितीन लगस, निलेश जगताप, आकाश रेणुसे,समीर नाईक, प्रशांत डाबी, सुहास कांबळे, कौस्तुभ कुलकर्णी, संदीप शिंदे, मंगल सोनटक्के, विशाल गब्दुले, माऊली साळुंखे, दीपक अहिरे, वैजंती फाटे, सविता माने व पुणे शहरातील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इमारतीला आग; घटनेत महिलेचा दुर्दैवी मृत्यू, दोघे जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

कोंढवा परिसरातील सनश्री बिल्डिंग या निवासी इमारतीमध्ये आज दुपारी ३:३० वाजता भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अग्निशमन दलाच्या तात्काळ कारवाईमुळे मोठी दुर्घटना टळली असली तरी, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तर या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले. ही आगीची घटना एनआयबीएम रोडवरील एका इमारतीत घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, कोंढवा परिसरातील प्रसिद्ध सनश्री बिल्डिंग मध्ये अचानक आगीचे लोट दिसून आले. स्थानिक नागरिकांनी त्वरित अग्निशमन दलाला आणि पोलीस नियंत्रण कक्षाला कळवले. काही



वेळातच अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. नेमकी आग कशामुळे लागली, हे अजून स्पष्ट झालेले नाही. मात्र प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किट किंवा गॅस गळती यामुळे आग लागल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विद्युत तांत्रिक तज्ज्ञांची टीम घटनास्थळी पोहोचली असून, याबाबत सखोल तपास सुरू आहे. इमारतीत अडकलेल्या काही रहिवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. आग आटोक्यात आली आहे. त्याचबरोबर या अपघातात जखमी झालेल्यांना उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाने मोठ्या प्रमाणावर पाण्याचा मारा सुरू केला आहे. आगीचा इतर मजल्यांवर फैलाव होऊ नये म्हणून सुरक्षेच्या दृष्टीने सर्व प्रयत्न केले जात आहेत. रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. काही रहिवाशांनी इमारतीतील सुरक्षितता उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

# एनएमएमएस परीक्षेचे गुण जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २२ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएस) परीक्षेची विद्यार्थ्यांना प्राप्त झालेल्या गुणांची यादी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा ही मानव संसाधन विकास मंत्रालयामार्फत राबविले जाते. आर्थिक मागास विद्यार्थ्यांमधून प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या प्रज्ञेची जोपासना, तसेच त्यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण व्हावे, हा या योजनेचा मुख्य गाभा आहे. शिष्यवृत्ती दरमहा एक हजार रुपये प्रमाणे याप्रमाणे प्रतिवर्षी १२ हजार रुपये देण्यात येणार आहे.

या यादीमध्ये विद्यार्थ्यांचे नाव, वडिलांचे नाव, आडनाव, आईचे नाव, यामध्ये स्पेलिंग दुरुस्ती असल्यास, तसेच जन्मतारीख, जात, आधारकार्ड आदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी १८ फेब्रुवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे. संबंधित शाळेच्या लॉगिन मध्ये ऑनलाईन अर्ज उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. ऑनलाइन आलेल्या अर्ज व्यतिरिक्त कोणत्याही पद्धतीने पाठविलेल्या दुरुस्त्या स्वीकारल्या जाणार नाही, तसेच दिलेल्या मुदतीत प्राप्त झालेल्या दुरुस्त्यांचाच विचार केला जाणार आहे. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना कार्बनलेस उत्तरपत्रिका देण्यात आलेली असल्याने पेपरची गुणपडताळणी केली जात नाही. शिष्यवृत्तीसाठीची निवड यादी जाहीर झाल्यानंतर त्यात कोणताही बदल करण्यात येणार नाही.

# भरधाव कार दुचाकीला धडकली अन् थेट बाजुच्या घरात घुसली

**ओतूर । प्रतिनिधी**

चालकाचे नियंत्रण सुटले अन् भरधाव कार रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दुचाकीला धडकली अन् त्यानंतर पुढे थेट बाजूच्या घरात घुसली. हा विचित्र अपघात ओतूर (ता. जुन्नर) हद्दीतील मोनिका चौकानजिक धोलवड-ओझर-नारायणगाव रस्त्यावर रविवारी (दि. ९) सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र कारमधील चारजण किरकोळ जखमी झाले. तसेच घरासह कारचे मोठे नुकसान झाले आहे.

कारमधील जखमींची नावे समजू शकली नाहीत. कार (एमएच १४ बीएक्स ५२९८) ही ओझरकडून ओतूरकडे जात होती. ओतूर हद्दीतील मोनिका चौकानजिक कार आली असता चालकाचे नियंत्रण सुटले आणि कारने रस्त्यालगत असणाऱ्या दुचाकीला धडकून पत्राशेडवजा घरामध्ये घुसली. कारमधील चौघे किरकोळ जखमी झाले.



तर घरासह कारचे मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवलदार सुरेश गेंगजे, संदीप भोते, शामसुंदर जायभाये, शुभम काशीद, मयुरी खोसे हे तत्काळ घटनास्थळी दाखल होत जखमींना मदत केली.

# सुरेश धस हे फडणवीसांचे दूत, त्यांच्यामुळेच लाँग मार्च थांबला, सचिन खरात आक्रमक, म्हणाले न्याय मिळेपर्यंत लढणार

**पुणे । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (उच् ञ्ञींशपवीर ऋवपर्रीळी) यांचे दूत सुरेश धस यांच्या शिष्टाईमुळे परभणी प्रकरणी निघालेला लाँगमार्च थांबला असल्याचे समजते. पण आम्ही आंबेडकरवादी संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत लढणार असल्याची भूमिका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सचिन खरात गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांनी घेतली आहे.

आमदार सुरेश धस यांनी लाँग मार्चमध्ये शिष्टाई केली, मग लॉंग मार्च थांबला असे समजते. परंतु हेच आमदार सुरेश धस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील नेते आहेत. त्यामुळं आमचा प्रश्न आहे की, आमदार सुरेश धस



आणि परभणी प्रकरणाचा काय संबंध आहे. परभणी प्रकरणांमध्ये संविधानाच्या प्रतिकृतीची ज्या समाजकंटकांने तोडफोड केली आहे. त्या समाजकंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल का झाला नाही? त्याची नार्को टेस्ट का केली नाही? असे सवाल सचिन खरात यांनी केले. भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू न्यायालयीन कस्टडीमध्ये १५ डिसेंबरला झाला आहे. परंतु मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्याच दिवशी मंत्रिमंडळाचा विस्तार केला. याचा अर्थ दलिताचा जीव गेला याचे काहीही गांभीर्य नाही असे सचिन खरात म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस विधानसभेत बोलताना म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू श्वसनाच्या आजारामुळं झाला आहे. हे खूप धक्कादायक वक्तव्य असल्याचे खरात म्हणाले. अजूनपर्यंत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळाला नाही. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूला जबाबदार असणारे एलसीबी निरीक्षक अशोक घोरबांड यांना निलंबित केले, पण बडतर्फ का नाही? त्यांच्यावर मनुष्यवादाचा गुन्हा दाखल का केला नाही? असा सवाल खरात यांनी केला. सुशिक्षित भीमसैनिकांचे गुन्हे का मागे घेतले नाहीत? असेही ते म्हणाले. त्यामुळं देवेंद्र फडणवीस यांचे दूत सुरेश धस यांच्या शिष्टाईमुळे जरी लाँग मार्च थांबला असला तरी आम्ही आंबेडकरवादी जोपर्यंत संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करणाऱ्या समाजकंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळत नाही तोपर्यंत लढणार असल्याचे खरात म्हणाले.

# जिल्हा दूध संघात भाकरी फिरणार? अध्यक्ष व उपाध्यक्षांचे राजीनामे; गुरुवारी होणार नवीन निवडी

**कात्रज । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची एकहाती सत्ता असलेल्या पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघात (कात्रज दूध) भाकरी फिरल्याचे पाहायला मिळत आहे. अध्यक्ष भगवान पासलकर आणि उपाध्यक्ष भाऊ देवाडे यांनी वैयक्तिक कारण पुढे करून दिलेले राजीनामे वरिष्ठांकडून स्वीकारण्यात आले आहेत. त्यामुळे रिक्त झालेल्या निवडीसाठी येत्या गुरुवारी (ता. १३) संघाच्या मुख्यालयात सकाळी ११ वाजता निवडणूक प्रक्रिया राबविली जाणार आहे.

राजीनाम्यासाठी वैयक्तिक कारण पुढे केले जात असले तरी मुख्यतः प्रत्येकासाठी एक वर्षाचा कार्यकाळ वरिष्ठांकडून दिला होता. विद्यमान अध्यक्ष आणि उपाध्यक्षांना सात ते आठ महिने अधिकचा कार्यकाळ मिळाल्याची माहिती सांगण्यात येत आहे. पक्षाच्या सूचनांन्वये दोन्ही पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. आता या दोन्ही पदांची निवड प्रक्रिया राबविण्याचा प्रस्ताव संघाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज लिमये यांनी विभागीय दुग्ध उपनिबंधकांकडे पाठविला होता. प्रस्तावानुसार विभागीय दुग्ध उपनिबंधक सहकारी निवडणूक राज्य प्राधिकरणाकडे अध्यक्ष व उपाध्यक्षपदासाठी निवड प्रक्रियेसाठी पत्र दिले. त्यावर प्राधिकरणाने अध्यासी अधिकारी म्हणून दुग्ध विभागाचे सहायक निबंधक सुधीर खंबायत यांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार नवीन नियुक्त्या गुरुवारी (ता. १३) होतील.

नव्याने निवड होणाऱ्या पदाधिकाऱ्यांचीही निवड एक वर्षासाठीच राहील. फेरपद्धतीने जास्तीत जास्त संचालकांना संधी देण्याचा आमचा मानस असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे संघाचे अध्यक्ष आणि उपाध्यक्षपद एक वर्षांसाठीच राहणार असून, ते आता नेमके कोणत्या तालुक्यास आणि कोणत्या संचालकाला मिळणार, याची उत्सुकता आहे. मात्र, यापूर्वी शिरूर आणि वेल्हे तालुक्याचा क्रमांक झाला असून, उपाध्यक्ष पदासाठी पहिल्या फेरीत दौंड तालुक्याला आणि दुसऱ्या फेरीत जुन्नर तालुक्याला प्रतिनिधित्व मिळालेले आहे. त्यामुळे आता यावेळी कोणकोणत्या तालुक्यांचा क्रमांक लागेल, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

पक्षनेतृत्वाकडून पदाधिकारी निवड करताना संचालक मंडळावर यापूर्वी काम केलेल्या अनुभवी संचालकांना संधी मिळणार की प्रथमच निवडून आलेल्या नवख्या संचालकांची वर्णी लागणार? असा प्रश्न आहे. जुन्या पदाधिकाऱ्यांना जुना अनुभवी माणूस असावा असे वाटते, तर नवख्या सभासदांनाही आपलीच वर्णी लागणार असल्याचा आशावाद आहे. मात्र, अनेक संचालक अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदांसाठी इच्छुक असले तरी वरिष्ठांचा निर्णय अंतिम राहणार आहे. त्यामुळे कोण किती आणि कशा प्रकारचे वजन वरिष्ठांकडे वापरणार यावर गणिते अवलंबून असणार आहेत.

# मालमत्तेच्या वादातून पुतण्यानेच केला काकाचा खून

**पुणे । प्रतिनिधी**

मालमत्तेच्या वादातून पुतण्याने आपल्या चुलत्यावर धारदार शस्त्राने वार करून त्यांचा खून केला. महेश तुपे (वय ५६) असे त्यांचे नाव आहे. याप्रकरणी, चतुःश्रृंगी पोलिसांनी शुभम महेंद्र तुपे (वय २८), रोहन सूर्यवंशी (वय २०), ओम निम्हण (वय २०) या तिघांच्या विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. याबाबत महेश यांचा मुलगा वरद तुपे (वय १९) याने फिर्याद दिली आहे. हा प्रकार शनिवारी (दि.८) सकाळी साडेसहाच्या सुमारास कोकाटे आळी, गणपती मंदिराजवळ पाषाणगाव येथील रस्त्यावर घडला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शुभम हा महेश तुपे यांचा पुतण्या आहे. त्यांच्यात जागा आणि आर्थिक कारणातून वाद होते. इतर दोघे आरोपी रोहन आणि ओम हे शुभम याचे साथीदार आहेत. चुलता महेश आणि शुभमची आई या दोघांचे एकत्र बँक खाते होते. त्यातील पैसे काढून दे, असे शुभम म्हणत होता. शनिवारी सकाळी महेश हे दूध आणण्यासाठी गेले होते. साडेसहाच्या सुमारास शुभम, रोहन आणि ओम या तिघांनी महेश यांच्यावर येथील कोकाटे आळी गणपती मंदिराजवळ धारदार शस्त्राने हल्ला केला. महेश यांच्या डोक्यात, चेहर्यावर, छातीवर आणि गळ्यावर वार केले. महेश हे हल्ल्यात गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव, सहायक पोलीस आयुक्त विठ्ठल दबडे, चतुःश्रृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयानंद पाटील, गुन्हे निरीक्षक अश्विनी ननावरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. फरार आरोपींचा पोलीस शोध घेत असून, त्यातील काही संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती पाटील यांनी दिली.

# दहा आरओ प्लांट, सात वॉटर एटीएमवर पालिकेची कारवाई

**पिंपरी । प्रतिनिधी**

गिलियन बेरे सिंड्रोमचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कठोर पाऊले उचलण्यास सुरूवात केली असून दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करणार्या अनधिकृत खाजगी आरओ प्लांट्सची तपासणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत आढळून आलेल्या अशा १० आरओ प्लांटवर (दि.८) महापालिकेने कारवाई केली असून संबंधित चालकांना प्लांट तात्काळ बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती माहिती आयुक्त शेखर यांनी दिली



जीबीएसचा प्रादुर्भाव व वाढत्या सार्वजनिक आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने खाजगी आरओ प्लांट्सच्या पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करण्यात येत आहे. त्यामध्ये अनधिकृत खाजगी आरो वॉटर ऑपरेटर्स दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करुन पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आले होते. असे दूषित पाणी प्रामुख्याने बोअरवेल्स व उघड्या जलस्त्रोतांमध्ये आढळते. नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आणि भविष्यातील आरोग्यविषयक समस्या टाळण्यासाठी सध्या शहरात दूषित पिण्याचा पुरवठा करणार्या अनधिकृत वॉटर बॉटलिंग आणि आर.ओ प्लांट्सवर तात्काळ कारवाई केली जात आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळावे, यासाठी अनधिकृतपणे दूषित पाण्याची बॉटलिंग करणार्या आरओ प्लांट्सवर कठोर कारवाई केली जात आहे. पाणी हे आरोग्याचा मूलभूत घटक असल्याने त्याच्या गुणवत्तेचा सखोल आढावा घेतला जाईल, असे पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले. प्रभागनिहाय करण्यात आली कारवाईपाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, प्लंबर यांच्या समन्वयाने क्षेत्रीय कार्यालयनिहाय या प्लांट्सची तपासणी केली जात आहे. यामध्ये फ क्षेत्रीय कार्यालय २, ड क्षेत्रीय कार्यालय २ आरओ प्लांट तर ७ एटीएम आरओ प्लांट, ब क्षेत्रीय कार्यालय १, ग क्षेत्रीय कार्यालय ४ आणि ह क्षेत्रीय कार्यालय १ आरओ प्लांटचा समावेश आहे. आर.ओ प्रकल्प (प्लांट) बंद बाबतच्या आदेशाचे उल्लंघन करणार्यांवर वैद्यकीय विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.